७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १२२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

## मुंबई पुणे एक्सप्रेस : घाटाला मिळणार बायपास

### ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे १ मेला उद्घाटन : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली मिसिंग लिंकच्या कामाची पाहणी

**मुंबई (दै. संध्या)**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला पूर्णतः ‘ॲक्सेस कंट्रोल’ बनवणाऱ्या महत्त्वाच्या ‘मिसिंग लिंक’ प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले असून, १ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सिग्नल-फ्री होणार असल्याने अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आज प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन मिसिंग लिंक प्रकल्पाची पाहणी केली. “मी स्वतः येथे येऊन कामाची गुणवत्ता तपासली असून काम समाधानकारक झाले आहे. उर्वरित किरकोळ कामे पुढील काही दिवसांत पूर्ण होतील. वेळेत आणि उच्च दर्जाने काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत,” असे त्यांनी सांगितले.



सुमारे १०.५ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पात दोन भव्य बोगदे, उंच व्हायाडक्ट आणि टायगर व्हॅलीवरील सुमारे १८२ मीटर उंच केबल-स्टेड पूल उभारण्यात आला आहे. सुमारे २३.७५ मीटर रुंद बोगदा हा जगातील सर्वात रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो. ७० किमी प्रतितास वेगाने वाहणारे वारे, मुसळधार पाऊस आणि कठीण भौगोलिक परिस्थितीत हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. लोणावळा तलावाच्या १८२ मीटर खालून हा रस्ता जाणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करणे म्हणजे एक आव्हान होते मात्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (MSRDC) हे मोठे आव्हान स्वीकारून प्रकल्प पूर्णत्वास नेल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

मिसिंग लिंक सुरू झाल्यानंतर घाटातील धोकादायक वळणे आणि वाहतूक पूर्णपणे बायपास होणार असून प्रवासाचा वेळ सुमारे २० ते ३० मिनिटांनी कमी होईल.

“या प्रकल्पामुळे घाटातील अपघात जवळपास शून्यावर येतील,” असा ठाम दावा शिंदे यांनी केला. यामुळे इंधनाची बचत, वेळेची बचत आणि प्रदूषणात लक्षणीय घट होणार आहे.

या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात बस आणि हलक्या वाहनांना प्राधान्य देण्यात येणार असून त्यामुळे घाटातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल.

## जेजुरी गडावर खंडोबा देवाला फळांची आरास



**जेजुरी (दै. संध्या) :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा मंदिरात जेजुरी येथील गुरव ,कोळी, वीर ,घडशी समाज संघटना, जेजुरी व श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी यांच्या वतीने मुख्य गाभारा मध्ये विविध फळांची आकर्षक सजावट करण्यात आली. उन्हााळा ऋतू मध्ये निसर्गामध्ये उपलब्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या विविध फळांची आरास खंडोबा मंदिरात करण्यात आली.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग




## ब्रेकिंग न्यूज

### ई-सुविधा पोर्टलचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**धुळे (दै. संध्या) :** धुळे जिल्हा प्रशासनाने एआय आधारित तयार केलेल्या ई-सुविधा पोर्टलचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिरपूर येथील कार्यक्रमात लोकार्पण करण्यात आले. यावेळी धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, महापौर मायादेवी परदेशी, आमदार अमरिशभाई पटेल, आमश्या पाडवी, राजेश पाडवी, काशीराम पावरा, मंजुळा गावित, राघवेंद्र भदाणे, अनुप अग्रवाल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या या पोर्टलबद्दल पालकमंत्री जयकुमार रावल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांचे अभिनंदन केले. धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या एआय आधारित इंजिनमुळे प्रशासनाचा कारभार गतिमान होऊन पारदर्शकता वाढेल. यामुळे लोकांची कामे सुलभ होतील, असे त्यांनी सांगितले.

## आरोग्य उपकेंद्रापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत सर्व आरोग्य समित्यांचे पुनरुज्जीवन करावे

### सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील आरोग्य सेवेच्या गुणवत्तेवर देखरेख करण्यासाठी व नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या, रुग्ण कल्याण समिती (RKS), जन आरोग्य समिती (JAS), महिला आरोग्य समिती (MAS), ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती (VHNSC) या समित्यांची जबाबदारी महत्वाची आहे. सर्वसामान्य नागरिकांना अधिक चांगली व परिणामकारक आरोग्य सेवा देण्यासाठी यासर्व समित्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी या संदर्भात आयोजित बैठकीत दिले. सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना विविध योजनांच्या माध्यमातून आरोग्यसेवा दिल्या जातात. या सर्व लोकहिताच्या योजनांची काटेकोर अंमलबजावणी करून नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आरोग्य समित्यांची भूमिका महत्वाची असते. ग्रामीण भागासाठी ‘ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता समिती




(VHNSC)” व शहरी भागासाठी “महिला आरोग्य समिती (MAS)” कार्यरत आहे. या समित्या स्वच्छता, पोषण, पाणीपुरवठा, तसेच प्राथमिक आरोग्य सेवा देण्यात महत्वाची भूमिका बजावत असतात. त्याचप्रमाणे “जन आरोग्य समिती (JAS)” व “रुग्ण कल्याण समिती (RKS)” या समित्या आरोग्य संस्थांमध्ये रुग्णकेंद्रित सेवा, सेवेची गुणवत्ता व निधीच्या पारदर्शक वापरासंबंधी लक्ष ठेवण्याची भूमिका बजावतात.

## गुजरातचा चेन्नईवर सहज विजय; गुणतालिकेत उलथापालथ



**मुंबई (दै. संध्या)**

ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखाली खेळत असलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाला या हंगामात हवी तशी सुरुवात करता आली नव्हती. पण त्यानंतर चेन्नईने लागोपाठ विजय मिळवून दमदार पुनरागमन केलं. आता पुन्हा एकदा चेन्नईची विजयाची गाडी रुळावरून घसरली आहे. स्पर्धेतील ३७ वा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. चेपॉकच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात चेन्नईला पहिल्या डावात फलंदाजी करताना अवघ्या १५८ धावा करता आल्या. या धावांचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सने दमदार विजय मिळवला आहे. गुजरात टायटन्स संघाला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १५९ धावा करायच्या होत्या. गुजरातची फलंदाजी पाहता, हे आव्हान फार मोठं नव्हतं. गुजरातला जशी सुरुवात हवी होती, तशी सुरुवात शुबमन गिल आणि साई सुदर्शनने करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ५८ धावांची सुरुवात करून दिली. शुबमन गिलने २३ चेंडूचा सामना करत ३३ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने १ चौकार आणि ३ षटकार खेचले. त्यानंतर साई सुदर्शन आणि जोस बटलरने मिळून मोर्चा सांभाळला. दोघांनी शेवटपर्यंत टिकून फलंदाजी केली. यादरम्यान साई सुदर्शनने ८७ धावांची तर जोस बटलरने नाबाद ३९ धावांची खेळी करून चेन्नईचा विजय निश्चित केला.

गुजरातने नाणेफेक जिंकून चेन्नईला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होत. प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या चेन्नईकडून सलामीला आलेला संजू सॅमसन स्वस्तात माघारी परतला. संजूने गेल्या सामन्यात शतक झळकावलं होतं. पण या सामन्यात तो अवघ्या ११ धावांवर माघारी परतला. तर उर्विल पटेल अवघ्या ४ धावांवर माघारी परतला. इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आलेला सर्फराज खान गोल्डन डकवर माघारी परतला. डेवाल्ड ब्रेव्हिस अवघ्या २ धावांवर बाद झाला. शेवटी शिवम दुबेने २२ धावांचे योगदान दिले. तर कार्तिक शर्माने १५ धावा केल्या. जेमी ओव्हरटनने १८ धावा केल्या. कर्णधार ऋतुराज गायकवाडने एकाकी झुंज देत ७४ धावांची खेळी केली.

या विजयानंतर गुणतालिकेत मोठी उलथापालथ पाहायला मिळाली आहे. चेन्नईला मागे टाकत गुजरातचा संघ गुणतालिकेत पाचव्या स्थानी पोहोचला आहे. गुजरातने आतापर्यंत ८ गुणांची कमाई केली आहे. तर चेन्नईचा संघ सहाव्या स्थानी घसरला आहे. चेन्नईने आतापर्यंत ६ गुणांची कमाई केली आहे.

### शासन आणि ‘युनिसेफ’मार्फत खेळ आणि संवादाच्या माध्यमातून धडे

## विद्यार्थ्यांना लिंग समभावाचे धडे

**मुंबई (दै. संध्या)**

लिंग भेद दूर करण्याबाबत राज्य शासनाच्या सहाय्याने अंगाई आणि युनिसेफतर्फे लिंग समभाव या विषयावर विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना प्रबोधनपर प्रशिक्षण दिले जात आहे. युनिसेफ आणि अंगाई (UNGEI) यांच्या सहकार्याने देशात पहिल्यांदा धाराशीव जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात आलेल्या लिंग समभाव शिक्षण उपक्रमामुळे ग्रामीण मुलींच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून येत आहे. खेळाधारित शिक्षण, संवाद आणि सहभागात्मक उपक्रमांच्या माध्यमातून किशोरवयीन मुला-मुलींमध्ये समानतेची जाणीव निर्माण होत आहे.

हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षण आणि प्रशिक्षणाची जिल्हा संस्था डाएटच्या (डीआयईटी) सहकार्याने राबवण्यात आला. संपूर्ण भारतामध्ये केवळ धाराशिव जिल्ह्यात हा प्रकल्प राबवला असून त्यामध्ये १२० शाळा, ८००हून अधिक शिक्षक आणि १८,००० हून अधिक मुलांचा सहभाग होता. धाराशिवमध्ये प्रायोगिकतत्वावर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रातील धाराशिवमध्ये, अंगाई-युनिसेफतर्फे लिंग समभाव हा विषय खेळाधारित शिक्षणाद्वारे किशोरवयीन मुले-मुली, शिक्षक आणि गावातील समुदायांना शिकवण्यात आला. मीना राजू मंच हा इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आला असून लिंग समभावाशी संबंधित विविध पैलूंची माहिती त्यांना करून देण्यात आली. त्यामध्ये संवाद, खेळ, चर्चा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. या कार्यक्रमाला स्थानिक संस्था स्वयं शिक्षण प्रयोग (एसएसपी), कोरो आणि मावा या स्वयंसेवी संस्थांचा सहभाग होता.



“मी माझ्या आईशी आणि काकूशी याबद्दल बोलले. त्यांनाही हा भेदभाव जाणवला नव्हता. त्या जुन्या परंपरेनुसार मुलींना कमी अन्नाची गरज असते, असंच मानून चालल्या होत्या. पण मी त्यांना समजावून सांगितले की आम्हा दोघांनाही समान अन्नाची गरज आहे, कारण आम्ही दोघेही समान कामं करतो,” आर्णी गावातील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या प्रज्ञा पाटोळे हिने स्वअनुभव कथन केला. शासन आणि युनिसेफ, अंगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या उपक्रमामुळे मुलींना लिंग समभावाचे शिक्षण मिळाले. यामुळे विद्यार्थ्यांच्या आणि त्यांच्या सहायाने कुटुंबीयांच्या विचारसरणीत सकारात्मक फरक पडत आहे. या उपक्रमामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले आहे. अनेक मुली उच्च शिक्षण घेऊ इच्छितात... प्रज्ञा संवाद साधताना म्हणाली, भविष्यात डॉक्टर बनून विशेषतः महिलांच्या आरोग्य, पोषण आणि मासिक पाळी स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याची इच्छा आहे. समाजात अजूनही दुर्लक्षित असलेल्या या विषयांवर काम करण्याचा तिचा निर्धार आहे. आज प्रज्ञा गावातील बालसभा, शाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये लिंग समभावाबाबत जागृती करते. “बदल सोपा नाही, पण लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे,” असे ती ठामपणे सांगते. एका सर्वसामान्य कुटुंबातून आलेली ही मुलगी आता समानता आणि न्याय्य समाजाचे स्वप्न पाहत आहे आणि ते पूर्ण करण्यासाठी धाडसाने पुढे जात आहे. या उपक्रमामुळे समाजात स्त्री-पुरूष समानतेचे धडे बालपणी मिळत असल्याने लवकरच मोठ्या प्रमाणात बदल घडू शकेल, असा विश्वास शासन आणि संस्थांच्या माध्यमातून व्यक्त केला जात आहे.

## देशाच्या प्रगतीमध्ये विधि शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण : राज्यपाल

**मुंबई (दै. संध्या)**

देशाच्या प्रगतीमध्ये विधि शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज येथे केले. राज्यपालांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. २५) मुंबई येथे १५ व्या वार्षिक ‘लीगल इरा इंडियन लीगल अवॉर्ड्स’ समारंभाला सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते.

एसोसिएशन ऑफ इंडियन लॉ फर्म्स आणि लीगल इरा मीडिया ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने स्थापन करण्यात आलेले हे पुरस्कार विधि क्षेत्रातील व्यावसायिक आणि फर्म्सना प्रदान केले जातात. देश आर्थिक महासत्ता बनण्याच्या उंबरठ्यावर उभा असताना, विधी व नियामक चौकटीची ताकद हा निर्णायक घटक ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

भारताची आर्थिक प्रगती, डिजिटल पायाभूत सुविधा आणि आत्मनिर्भर भारतांतर्गत उत्पादन क्षेत्रातील उद्दिष्टपूर्ती या सर्व बाबी आपल्या विधी व्यवस्थेची गुणवत्ता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता यावर अवलंबून असल्याचे राज्यपालांनी सांगितले. करारांचे मसुदे तयार करणे, वादांचे निराकरण करणे, उद्योगांना सल्ला देणे आणि हक्कांचे संरक्षण करणे या माध्यमातून विधी क्षेत्रातील व्यावसायिक देशाला गुंतवणूक, व्यापार आणि विकासाचे दृष्टीने आकर्षक




गंतव्य बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, असेही राज्यपालांनी नमूद केले. असोसिएशन ऑफ इंडियन लॉ फर्म्सने राज्यातील विद्यापीठांशी सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले. उदयोन्मुख क्षेत्रांशी सुसंगत, व्यवहाराभिमुख अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी तसेच तंत्रज्ञानाधारित कायदा, नियामक चौकट आणि बदलत्या व्यावसायिक वातावरणाशी सुसंगत शिक्षणासाठी उद्योग–शैक्षणिक सहकार्य अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

कायदा फर्म्सनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण व उमेदवारीच्या (अप्रेंटिसशिप आणि इंटर्नशिपच्या) संधी निर्माण कराव्यात, असे आवाहन राज्यपालांनी केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा मौलिक अनुभव मिळेल, त्यांची रोजगारक्षमता वाढेल आणि विधी क्षेत्रासाठी सक्षम व भविष्योन्मुख मनुष्यबळ तयार होईल, असे त्यांनी सांगितले.

## संपादकीय

# हे असे भारी भारी आमदार कुठे सापडतात?

आमदार संजय गायकवाड आपल्या पक्षाची कीर्ती सर्वदूर जावी यासाठी जी विधाने करत आहेत त्यासाठी त्यांचा सत्कार करायला हवा. त्या सत्काराची हीच ती वेळ आणि हाच तो क्षण आहे... १९८८ मध्ये गोविंद पानसरे यांनी लिहिलेले पुस्तक गायकवाड यांच्या हाती पडले आणि त्यांनी त्या प्रकाशकाला जे काही सुनावले त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. आम्ही तर शिवाजी पार्कवर (माफ करा, छत्रपती शिवाजी महाराज पार्कवर असे आता म्हणायचे का?) त्यांच्या जाहीर सत्काराची तयारी सुरू केली होती. मात्र त्यांनी मध्येच केलेल्या विधानाबद्दल माफी मागितली. त्यामुळे सत्कार ठेवावा की नाही, हा प्रश्न पडला आहे. साहेब, हे असे भारी भारी आमदार आपल्याला कुठे सापडतात..? त्यासाठी आपण काही विशेष शोधमोहीम राबवली होती का..? हे असे आमदार आपली प्रतिमा उंचावत आहेत की बिघडवत आहेत? यावर पक्षात कोणी चिंता किंवा चर्चा करते का..? असे काही बाळबोध प्रश्न आमच्या मनाला पडले आहेत. आमदार गायकवाड यांनी प्रकाशकाला, तुला पण गोविंद पानसरे यांच्याकडे पाठवू का? असे काहीतरी सांगितले... याचा आधार घेऊन भाजपचे काही नेते यामागे नेमका कोणाचा हात असेल याचा शोध घ्या...असे पत्र पोलिस महासंचालकांना पाठवण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. आपल्याला माहिती असावी म्हणून कळवले.

साहेब, यानिमित्ताने काही प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याची उत्तरे आमदार साहेबांना द्यायला सांगता का? म्हणजे विनाकारण तुमच्या डोक्याला ताप होणार नाही. प्रश्न तसे खूप आहेत पण जागेअभावी सगळे प्रश्न लिहिता येणार नाहीत. तरीही काही मोजके प्रश्न असे आहेत... पानसरे यांचे पुस्तक वाचण्याची सक्ती करायची की आत्तापर्यंत ज्यांनी ज्यांनी ते पुस्तक वाचले त्या सगळ्यांना शिक्षा करायची..? शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करायचा नाही तर मग ज्या शाळेत संजय गायकवाड शिकले त्या शाळेचे नाव 'शिवाजी विद्यालय' आहे त्याचे काय करायचे..? नीलमताई गोऱ्हे म्हणाल्याप्रमाणे, शाळेच्या नावामागची भूमिका योग्य आहे. पण नाव देण्याचा मार्ग चुकला..! असे सांगायचे का? संजय गायकवाड यांच्यापर्यंत ते पुस्तक पोहोचवण्यामागे काही परकीय शक्तींचा हात होता का? एखादे पुस्तक ३८ वर्षानंतर अशा पद्धतीने चर्चेत आणले त्यामागे त्या पुस्तकाचा खप वाढावा अशी तर कुणाची चाल नसेल..? छत्रपती शिवाजी महाराज लोककल्याणकारी होते. त्यांचे वर्णन करताना रामदास स्वामींनी

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू।
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी॥१॥
परोपकाराचिया राशी। उदंड घडती जयासी।
तयाचे गुणमहत्त्वासी। तुळणा कैची॥२॥
आचारशील विचारशील। दानशील धर्मशील।
सर्वज्ञपणे सुशील। सकाळ ठायीं॥३॥

असे लिहिले होते. छत्रपती शिवाजी महाराज, यशवंत... कीर्तिवंत... सामर्थ्यवंत... वरदवंत... पुण्यवंत... नीतीवंत... असे जाणता राजा होते. यातले कोणते गुण आपल्या आमदार महोदयांनी घेतले, याचा शोध घेण्यासाठी एखादी समिती स्थापन करणार का? याच महोदयांनी आमदार निवासातल्या वेटरला बदडून काढले होते. त्यावेळी त्यांच्यात नेमके कोणते आचारशील, विचारशील वर्तन संचारले होते? आत्तापर्यंत गायकवाड यांनी जी विधाने केली ती कोणाची प्रेरणा घेऊन केली? पानसरे यांचे पुस्तक त्यांनी न वाचताच वेगवेगळ्या शिव्यांचा शब्दसंग्रह त्या प्रकाशकाला मध्यरात्री एक वाजता बहाल केला त्याची एखादी छोटी पुस्तिका काढायची का? म्हणजे भविष्यात आपल्या पक्षात येणाऱ्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना कोणाशी कसे बोलावे याचा वस्तुपाठ मिळेल, असे आपल्याला वाटते का? नववी पास नेते इतक्या उच्च दर्जाच्या शिव्यांचे धनी असतात हे तुम्हाला माहिती होते का? अशा कर्तृत्वसंपन्न आमदारांना अभिजात मराठीची सेवा करण्यासाठी एखादी समिती स्थापन करून देणार का..? असो. आपला जास्त वेळ घेत नाही प्रत्यक्ष भेटीत बोलूच.

## संस्कृत सुभाषित

दान धर्मश्च विद्या च रुपं शीलं कुलं तथा।
सुखमायुर्यश्चैव नव गौप्यानि यत्नः।।
अर्थ – दान, धर्म, विद्या, रूप, शील, कुल, आरोग्य, सुख आणि आयुष्य या नऊ गोष्टींचे रक्षण प्रयत्नपूर्वक केले पाहिजे.

## गुरु वचन

### वास्तव्याची जाण

एका राज्याचा राजा दररोज सकाळी फेरफटका मारण्यासाठी जात होता. त्याला रस्त्यात जी व्यक्ती पहिल्यांदा दिसेल त्याची तो प्रत्येक इच्छा पूर्ण करायचा.

असेच एका दिवशी निघाला असता त्याला एक ब्राह्मण भेटला. राजाने त्याला विचारले की, ब्राह्मण देवता मी आपली काय मदत करु. ब्राह्मण लाजून म्हणाला, महाराज आपण जे उचित समजाल त्यावर राजा म्हणाला, आपण सांगा काय पाहिजे. ब्राह्मणाच्या मनात लोभ आला. तो राजला म्हणाला, महाराज आपण फिरून या तोपर्यंत मी विचार करतो की, मला काय पाहिजे. ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून राजा फिरण्यासाठी गेला. नंतर ब्राह्मणाच्या मनात विचार आला की, अशी संधी पुन्हा-पुन्हा मिळत नाही. एकदाच असे काही तरी मागतो की, पुन्हा कधी काही मागण्याची गरज पडणार नाही. राजा फिरून आला व त्याने ब्राह्मणाला त्याची इच्छा विचारली. तेव्हा ब्राह्मणने राजाला पूर्ण राज्य मागीतले. राजानेही ताबडतोब यासाठी होकार दिला व ब्राह्मणाला म्हणाला, मी तर अनेक दिवसांपासून याची प्रतिक्षा करत होतो की या ओझ्यातून केव्हा मुक्त होईल. आपण येथेच थांबा मी राज्याचा कारभार आपल्याकडे सोपवण्याची व्यवस्था करतो. असे म्हणून राजा महालात जातो. राजाचे म्हणणे ऐकून ब्राह्मण चिंतेत पडतो. त्याला वाटत नव्हते की, राजा एवढ्या सोप्या पद्धतीने राज्य सोपवून देईल. ब्राह्मणाच्या मनात ईश्वरीय भावना जागृत झाली आणि त्याने विचार केला की, वास्तविकतेमध्ये वैरागी तर राजा आहे. मी तर फक्त ढोंग करतो. हा तर मोहापासून दूर आहे. ब्राह्मणाला वास्तव्याची जाण झाली आणि तो तिथून निघून गेला. त्याला आपल्या मोहावर पश्चाताप झाला.

## उपदेशकथा

### वेळेची किंमत

एक फार मार्मिक कथा आहे. ग्रॅहम बेल यांच्या दुकानात पुस्तकाच्या दुकानात एकदा एक ग्राहक आला.त्याला एक पुस्तक खरेदी करायचे होते. बेल यांनी दुकानात एक पाटी लावली होती.' एकच किंमत',गिऱ्हाईकाने पुस्तक निवडले आणि किंमत विचारली,बेलने सांगितले.'दोन डॉलर'. गिऱ्हाईकाने विचारले. काही कमी नाही करणार का? बेलने काही न बोलता पाटीकडे बोट दाखवले! पण तो ग्राहक पुन्हा म्हणाला,अहो,दहा टक्के सूट तर सर्वच दुकानदार देतात.तुम्ही पुस्तक कितीला देणार ते सांगा! बेल म्हणाला, 'आता या पुस्तकाची किंमत आहे दोन डॉलर आणि दहा सेंट.' गिऱ्हाईक आश्चर्याने म्हणाले,'अहो आताच तुम्ही दोन डॉलर म्हणालात,लगेच वाढली कशी? ग्रॅहम बेल म्हणाले,'मित्रा,दोन डॉलर ही या पुस्तकाची किंमत आहे आणि दहा सेंट ही तू माझ्या घेतलेल्या दोन मिनीटांची किंमत आहेर तू अजून उशीर लावशील तर पुस्तकांची किंमत आणखी वाढत जाईल!' त्या ग्राहकाने निमूटपणे वाढलेली किंमत दिली आणि पुस्तक घेऊन बाहेर पडला!

कथा उपदेश: वेळ ही पैशाइतकीच मौल्यावान वस्तू आहे.तिची उधळपट्टी करू नये.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | २१:१८:२८ |
| २७ एप्रिल २०२६ | योग:ध्रुव २१:३५:१५ |
| सोमवार | करण:विष्टि १८:१६:१३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बव (अहोरात्र) |
| वैशाख शके | सूर्य:मेष |
| संवत्– १९४८ | चन्द्र:सिंह |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – जिल्काद |
| मास– वैशाख | तारीख – ९ |
| ऋतु– सौर वसंत | विशेष |
| शुक्ल पक्ष | मोहिनी एकादशई |
| तिथि:एकादशी | सखाराम महाराज |
| १८:१६:१३ | रथोत्सव – अमळनेर |
| नक्षत्र:पूर्वा चैत्री | सासवड यात्रा |

## दै.'संध्या' धमाल सूडोकु क्र. १३२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 9 | 5 | | | | 7 | |
| 2 | | | | 6 | 9 | 1 | 8 | 3 |
| | | | | 7 | | | | 9 |
| 9 | 6 | 5 | | | 8 | 4 | | |
| | | 2 | | | | 9 | | |
| | | 4 | 6 | | | 7 | 5 | 2 |
| 5 | | | | 1 | | | | |
| 7 | 1 | 3 | 2 | 8 | | | | 5 |
| | 2 | | | | 6 | 3 | | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १३१ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 9 | 2 | 3 | 5 | 7 | 4 | 1 | 8 |
| 8 | 3 | 7 | 1 | 9 | 4 | 6 | 2 | 5 |
| 1 | 4 | 5 | 6 | 8 | 2 | 7 | 9 | 3 |
| 2 | 1 | 9 | 8 | 7 | 6 | 5 | 3 | 4 |
| 7 | 6 | 4 | 5 | 3 | 9 | 2 | 8 | 1 |
| 5 | 8 | 3 | 2 | 4 | 1 | 9 | 7 | 6 |
| 3 | 7 | 6 | 9 | 1 | 5 | 8 | 4 | 2 |
| 9 | 5 | 1 | 4 | 2 | 8 | 3 | 6 | 7 |
| 4 | 2 | 8 | 7 | 6 | 3 | 1 | 5 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११२४ – डेव्हिड पहिला स्कॉटलंडच्या राजेपदी.
- १२९६ – डनबारची लढाई – एडवर्ड पहिल्याने स्कॉटलंडचा पराभव केला.
- १५०९ – पोप ज्युलियस दुसऱ्याने व्हेनिसला वाळीत टाकले.
- १५२१ – माक्टानची लढाई – पृथ्वीप्रदक्षिणा करणारा फर्डिनांड मॅगेलन फिलिपाईन्समध्ये स्थानिक रहिवाश्यांशी लढताना मृत्युमुखी.
- १६६७ – अंध व हलाखीत दिवस काढणाऱ्या जॉन मिल्टनने आपले महाकाव्य पॅरेडाईझ लॉस्ट १० ब्रिटीश पाउंडला विकले.

### राष्ट्रीय

- १५२६ – मुगल घराण्यातील बाबर दिल्लीचा स्वयंघोषित बादशहा बनला.
- १८५३ – मुंबई-पुणे पहिली रेल्वे सुरू.
- १८५४ – मुंबई-पुणे तारायंत्राद्वारे संदेशवहन सुरू.

### जन्म

- १७०१ – चार्ल्स इमॅन्युएल तिसरा, सार्डिनीयाचा राजाचा जन्म.
- १८२२ – युलिसिस एस. ग्रँट, अमेरिकेचा १८वा राष्ट्राध्यक्षाचा जन्म.
- १८८३ – नाटककार भा. वि. तथा मामा वरेरकर यांचा जन्म.
- १९२७ – कोरेटा स्कॉट किंग, मार्टिन ल्युथर किंगची पत्नीचा जन्म.

### निधन

- ६३० – अर्देशर तिसरा, पर्शियाचा राजाचे निधन.
- १५२१ – फर्डिनांड मॅगेलन, पोर्तुगीझ शोधकाचे निधन.
- १६०५ – पोप लिओ अकरावा याचे निधन.
- १८९८ – ज्योतिर्विद शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचे निधन.
- १९८० – पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील यांचे निधन.

## : SMS :

Jab apka SMS
ata hai mera rom
machal jata hai
Sara badan
kaamp jata hai
Dil main gudgudi
hoti hai
Stupid, yeh apka
kasoor nahi, mera
phone Vibrator
per hota hai.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.९ | २६.६ |
| अहमदनगर | ३७.६ | २६.१ |
| अकोला | ४१.८ | २८.४ |
| अमरावती | ४१ | २७.९ |
| बीड | ४३.४ | ३०.८ |
| भंडारा | ४२.५ | २९.९ |
| बुलढाणा | ४२ | २५.३ |
| चंद्रपूर | ४५.१ | ३०.१ |
| चेन्नई | ४४.४ | ३५.९ |
| नवी दिल्ली | ४२ | २७.८ |
| धुळे | ४०.९ | २४.९ |
| गोंदिया | ४१.४ | २८.७ |
| जळगाव | ४२ | २८.७ |
| कोल्हापूर | ३८.९ | २३.७ |
| लातूर | ३७.८ | २५.५ |
| मुंबई | ४३.४ | ३२.८ |
| नागपूर | ४१.८ | २९.९ |
| नांदेड | ४०.५ | २७.९ |
| नंदूरबार | ४०.१ | २७.२ |
| नाशिक | ३८.८ | २५.३ |
| पुणे | ३५.८ | २५.४ |
| पंढरपूर | ३९.६ | २५.५ |
| सातारा | ३७.७ | २२.५ |
| सांगली | ३९.६ | २३.९ |
| सोलापूर | ४०.४ | २६.५ |
| वर्धा | ४२.६ | २९.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा:उत्तर व्यापारिक वाद संपुष्टात येतील. कुटूंबात आनंदाचे वातारण येईल.

**तुळ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पूर्व सामाजिक कामात रस वाटेल. आपला सल्ल्याला महत्व मिळेल.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पूर्व सामान्य कामासाठी दिवस चांगला राहण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर जिद्द धरू नका नुकसान होईल. साथीदाराच्या सामाजिक स्थितीची चिंता वाटेल.

**मिथुन :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:उत्तर धार्मिक प्रवृत्ती वाढेल. आपल्यात असलेले गुण व योग्यता यामुळे समाजात प्रतिष्ठा वाढेल.

**धनु :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : उत्तर कार्यक्षमतेत वाढ झाल्याने कठिण कामात देखील यश मिळेल.

**कर्क :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : पूर्व एखादे राहिलेले काम पूर्ण झाल्याने आनंद होईल. नोकरीत सहकाऱ्यांकडून मदत मिळेल.

**मकर :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व सामान्य गोष्टींवरील परिणामांवर ध्यान ठेवा. मानसिक अस्थिरतेमुळे कामात अडचणी येऊ शकतात.


**सिंह :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर आर्थिक योजनांवर चर्चा होईल. स्थायी मालमत्तेची खरेदी:विक्री संभव आहे. सामाजिक कार्यात आपले योगदान राहील.

**कुंभ :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पूर्व व्यापार चांगला चालेल. भौतिक सुख समाधानांची आवड निर्माण होईल. अनावश्यक राग करु नका.

**कन्या :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पूर्व चांगल्या मित्रांचा संपर्क फायदेशीर राहील. प्रतियोगितामध्ये आपल्याला विजय मिळेल. व्यवसायाची प्रगती होईल.

**मीन :** शुभ रंग:हिरवा: शुभ दिशा:दक्षिण नम्रता व व्यवहार कुशलता आपल्याला प्रत्येक कामात यश देईल. विरोधकांपासून सावध रहा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १३२



**आडवे शब्द**

१. सुयोग्य तिऱ्हाईताने कानउघडणी करणे (वाक्प्रचार)
९. त्वरेने, एका मागून एक
१२. दरवाजा
१३. खेद आणि खंत
१४. पर्जन्यकाळ
१५. खंदक
१६. आतेमामे भावंडात लग्न असल्यास एकाच्या सासूबाई
१७. किरकोळ
१९. लेखणीचा एक जुना प्रकार
२१. रक्षण करणारा
२३. शेराचा सोळावा भाग
२४. आजूबाजूला
२७. कोवळी फांदी
२९. हिंदीत आयोध्या
३०. एक मंगलवाद्य
३२. नशीब
३३. अगदी थोड्या प्रमाणात
३५. पुनर्जीवन
३८. चौक
३९. घोड्याच्या पायाखाली लावलेली लोखंडी पट्टी
४१. चारपट
४२. होडी
४३. खमण ढोकळ्याचे शहर
४४. द्यायचा-खायचा मान
४५. ग्रामप्रमुख
४६. निरुपोगी अळू
४८. किंमत, पैसा
५०. जोरदार वाद
५१. दृष्टीभेट
५४. जन्मकुंडलीत आडवी येणारी
५५. अगदी सत्य, वास्तव
५७. मालक
५८. मध्यस्थ
६०. भित्रा, घाबरट
६२. हळूवारपणे
६३. हिंदीत मदत
६६. वाणी, बोलणे
६७. रम्य, मनोहारी
६८. प्रश्नोत्तरे
७०. पदार्थाचा सूक्ष्म भाग
७१. फोडणीचे ताक
७३. एक श्वासरोग
७४. नामघोष
७६. सुस्वरूप स्त्री
७७. परिस्थिती
७८. दुसऱ्यासाठी केलेला खर्च

**उभे शब्द**

१. उदाहरणासह
२. महिला
३. सदोदित, रोज
४. मृत्यू, वेळ
५. कालवा (हिंदी)
६. मोठ्या संख्येत धाड घालणारा कीटक
७. भाजलेले हरभरे
८. शेजारी शेजारी
९. चुकवाचुकव
१०. जप्ती
११. पांढुरक्या रंगाचा
१४. पवित्र
१६. मर्कट
१८. रोखलेली नजर
२०. कापूस
२२. बागवान
२५. खून, हत्या
२६. खळबळजनक
२८. जय पराजय
२९. मालिन्य नसलेली याअर्थी मुलींचे एक नाव
३१. आई-वडील
३२. अवधान, लक्ष
३४. नरमांजर
३६. आशीर्वाद
३७. मनोबल
३८. होडी
४०. गर्जना, आरोळी
४१. अस्सल
४४. हिस्सा
४५. रसाचा आंबा
४७. 'मनसे'चे ठाकरे
४९. टप्प्या-टप्प्याचा प्रवास
५०अ. चाणक्यनीतीनुसार शेवटचे दोन उपाय
५२. भावा-भावांची आदर्श जोडी
५३. जाडसर पीठ
५५. दृष्ट, पक्का
५६. छोटा माठ
५७. आभार
५९. छोटी बैलगाडी
६१. रविवासर
६४. दया येण्याजोगी स्थिती
६५. चेहऱ्यावरची रेषही न हलवता संवादफेकीच्या जोरावर बाजी मारून गेलेला 'जानी' नट
६८. च्या समक्ष, च्या देखत
६९. वटवट
७०. हद्द, परिसीमा
७२. वर्तमानपत्रातील कप्पा
७३. दिशांची संख्या
७५. विश्व, दुनिया
७६. मतप्रवाह, विचारसरणी

**जम्बो शब्दकोडे क्र. १३१ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.कवडीचुंबक ५.कस ७.त्रिशूल ९.रसा ११.पार १२.दार १३.छापखाना १४.बातमी १६.डझन १९.क्षीण २०.कळकट २१.समजूतदार २५.तालेवार २७.मुकुट २८.टाच ३०.साज ३२.पनीर ३४.पहिलवान ३६.हळवा ३८.दरा ४०.झेला ४१.गरूड ४२.सत्यवान ४४.दाब ४५.क्ष ४६.मार ४७.कुकर ४८.सासर ५०.प्रथा ५१.भोळा ५२.मगरमिठी ५५.क्षणप्रभा ५६.दाट ५७.राणीव ५८.कैरी ५९.तकवा ६१.दक्ष ६२.तप ६४.नाक ६५.वैगुण्य ६७.सदा ६९.वरात ७१.अभूतपूर्व ७२.वामन ७४.लक्षण ७६.ब्र ७७.सनद ७८.बाग ७९.पूल ८०.झुणका ८१.अनल ८२.तूप ८३.क्षौर

उभे उत्तर : १.कपाळकरंटा २.वर ३.चुंदा ४.बरड ५.कप ६.सखाराम ८.शूर ९.रत १०.सामील १३.छान १४.बाण १५.चिकट १७.झबले १८.च्युत १९.क्षीर २१.सर २२.जून २३.दामिनी २४.मुकुल २५.ताजवा २६.वाणी २९.चपला ३०.सालस ३१.बळ ३३.रदन ३५.नगर ३६.हडकुळा ३७.वासरमणी ३९.खबरदारी ४०.झेप ४३.वावर ४४.दास ४६.माथा ४८.साठी ४९.क्षणभंगुर ५०.प्रभात ५१.भोट ५३.गवत ५४.मिथ्या ५६.दावा ५७.राक्षस ५८.कैक ६०.कर्णभूषण ६३.पवन ६४.नातलग ६६.हापूस ६८.दावानल ७०.सणवार ७३.मद ७५.शेपू ७७.सन ७८.बाप

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### मॉन्ट्रा इलेक्ट्रिककडून इलेक्ट्रिक स्मॉल ट्रक श्रेणीचा विस्तार

■ दोन नवीन कंपन्या सूचीबद्ध होणार

पुणे (दैनिक संध्या) : पुणे : Montra Electric या मुरुगप्पा समूहाच्या क्लीन मोबिलिटी ब्रँडने इलेक्ट्रिक लहान ट्रक श्रेणीचा विस्तार करत दोन नवे व्हेरिएंट्स — EVIATOR 350 (32kWh) आणि EVIATOR 350L+ (50kWh) सादर केले आहेत. EVIATOR 350 (32kWh) हा प्रामुख्याने शहरातील दैनंदिन मालवाहतुकीसाठी तयार करण्यात आला असून तो प्रत्यक्ष वापरात सुमारे १४० किलोमीटरपर्यंत अंतर पार करू शकतो. लास्ट माईल डिलिव्हरीसाठी हा किफायतशीर आणि कार्यक्षम पर्याय मानला जात आहे. दुसरीकडे, EVIATOR 350L+ (50kWh) हा लांब पल्ल्याच्या तसेच आंतरशहरी वाहतुकीसाठी डिझाइन करण्यात आला आहे. या ट्रकची प्रमाणित रेंज ३०० किलोमीटरपेक्षा जास्त असून प्रत्यक्ष वापरात तो २०० किलोमीटरपेक्षा अधिक अंतर सहज पार करतो. त्यामुळे रेंज संपण्याची चिंता मोठ्या प्रमाणात कमी होते. तसेच, रेफ्रिजरेटेड ट्रान्सपोर्ट आणि महापालिका सेवांसारख्या अधिक ऊर्जा लागणाऱ्या कामांसाठीही हा व्हेरिएंट सक्षम ठरतो. कंपनीच्या मते, हा विस्तार त्यांच्या प्रत्यक्ष वापरातील अनुभवावर आधारित आहे. मॉन्ट्रा इलेक्ट्रिकच्या ६०० हून अधिक वाहनांनी मिळून आतापर्यंत ६५ लाख किलोमीटरहून अधिक अंतर पार केले आहे. या अनुभवातून विविध व्यावसायिक गरजा आणि वापराच्या पद्धतींचे सखोल आकलन झाले असून त्यावर आधारित ही नवीन मॉडेल्स विकसित करण्यात आली आहेत. सध्याचा 40kWh क्षमतेचा EVIATOR हा या श्रेणीतील मुख्य मॉडेल असला, तरी नव्या 32kWh व्हेरिएंटमुळे १४० किलोमीटरपर्यंतच्या फेऱ्यांसाठी अधिक परवडणारा पर्याय उपलब्ध झाला आहे. यामध्ये ९९ टक्के अपटाइमची कंपनीची ओळख कायम ठेवण्यात आली आहे. हा विस्तार जानेवारी २०२५ मध्ये सादर करण्यात आलेल्या EVIATOR 350L च्या यशानंतर करण्यात आला आहे. या मॉडेलने अवघ्या ११ महिन्यांत ३.५ टन श्रेणीमध्ये ३० टक्क्यांहून अधिक बाजारपेठेचा हिस्सा मिळवला आहे. या नव्या व्हेरिएंट्समुळे मॉन्ट्रा इलेक्ट्रिक आता एकाच प्रकारच्या उत्पादनाऐवजी वापर आणि गरजेनुसार वाहनांची निवड करण्याची सुविधा देत आहे. त्यामुळे ताफामालकांना शहरातील लहान फेऱ्या असोत किंवा लांब पल्ल्याची वाहतूक, त्यानुसार योग्य बॅटरी क्षमता निवडण्याचा अधिक लवचिक पर्याय उपलब्ध झाला आहे.

### लक्स इंडस्ट्रीजकडून वर्टिकल A आणि C व्यवसायांच्या डिमर्जरला तत्त्वतः मंजुरी

पुणे (दैनिक संध्या) : Lux Industries Limited ने आपल्या व्यवसाय संरचनेत मोठा बदल करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत वर्टिकल A आणि वर्टिकल C व्यवसायांच्या डिमर्जरला तत्त्वतः मंजुरी दिली आहे. हा निर्णय 23 एप्रिल 2026 रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. हा निर्णय प्रवर्तक गटातील सदस्यांमध्ये झालेल्या फॅमिली सेटलमेंट कराराच्या (FSA) पार्श्वभूमीवर घेण्यात आला आहे. यापूर्वी 22 नोव्हेंबर 2023 रोजी कंपनीने आपल्या व्यवसायाचे वर्टिकल A, B आणि C अशा तीन विभागांमध्ये विभाजन करण्यास मंजुरी दिली होती. नव्या प्रस्तावानुसार वर्टिकल A आणि वर्टिकल C या दोन विभागांचे विभाजन करून स्वतंत्र पूर्णतः मालकीच्या सहाय्यक कंपन्या स्थापन केल्या जातील आणि त्यांची नंतर सूचीबद्धता केली जाईल. तर वर्टिकल B हा व्यवसाय Lux Industries Limited अंतर्गतच सुरू राहणार आहे. कंपनीच्या मते, या पुनर्रचनेमुळे व्यवसाय संरचना अधिक सुसूत्र होईल, प्रत्येक वर्टिकलला स्पष्ट धोरणात्मक दिशा मिळेल आणि भागधारकांसाठी दीर्घकालीन मूल्यनिर्मिती होईल. हा निर्णय फॅमिली सेटलमेंट कराराशी सुसंगत असून, व्यवसाय, मालमत्ता आणि व्यवस्थापन यांचे स्पष्ट विभाजन करून दीर्घकालीन समन्वय राखण्याचा उद्देश आहे. प्रस्तावित रचनेनुसार वर्टिकल A मध्ये Lux Cozi, Lux Parker, ONN आणि Lux Cottswool हे प्रमुख ब्रँड्स समाविष्ट असतील, ज्यांची उत्पादन केंद्रे पश्चिम बंगाल, पंजाब आणि तमिळनाडू येथे आहेत. वर्टिकल B मध्ये Lux Venus, Lux Nitro, Lyra आणि Lux Inferno हे ब्रँड्स असतील, ज्यांची उत्पादन युनिट्स पश्चिम बंगाल, लुधियाना, गाझियाबाद आणि तमिळनाडू येथे आहेत. वर्टिकल C मध्ये Lux Classic, GenX, Lux Karishma, Lux Amore आणि Lux Champion हे ब्रँड्स समाविष्ट असतील, ज्यांचा मुख्यतः तिरुप्पूर (तमिळनाडू) येथून संचालन होईल.

### महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल, दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सकाळच्या सत्रात होणार

पुणे (दैनिक संध्या) : उन्हाळ्यात विजेच्या वाढत्या मागणीच्या कालावधीत आणि पावसाळी परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून वीज यंत्रणेशी संबंधित विविध देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे सध्या वेगात सुरु आहे. मात्र उन्हाचा तडाख्यात नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी देखभाल व दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे संबंधित दिवशी सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करावेत असे निर्देश मुख्यालयाकडून क्षेत्रीय कार्यालयांना शनिवारी देण्यात आले. महावितरणची प्रामुख्याने पावसाळ्यात वीजयंत्रणा सज्ज ठेवण्यासाठी तसेच वीजपुरवठा खंडित होणे व वीजसुरक्षेचे धोके टाळण्यासाठी वीज ग्राहकांना पूर्वसूचना देऊन देखभाल व दुरूस्तीचे कामे राज्यभरात सध्या सुरु आहे. साधारणतः मे महिन्याच्या अखेरीस सर्व कामे पूर्णत्वास जातात. मात्र सद्यस्थितीत सकाळी १० ते दुपारी २ किंवा चार वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद ठेवत देखभाल व दुरुस्तीचे कामे सुरु आहेत. नागरिकांसाठी ही गैरसोयीची वेळ टाळण्यासाठी यापुढे संबंधित दिवशी व वीजवाहिनीच्या पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीचे काम यापुढे सकाळी ७ ते ११ वाजेदरम्यान करण्याचे निर्देश मुख्यालयाकडून देण्यात आले आहे. महावितरणच्या देखभाल दुरुस्तीचे पूर्वनियोजित कामे करताना सर्वप्रथम प्राधान्याने पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याचे तसेच संबंधित वीजग्राहकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर ‘एसएमएस’द्वारे तसेच प्रसिद्धी माध्यमांद्वारे कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

# फायर सेफ्टी व सिक्युरिटी क्षेत्रातून राष्ट्रनिर्मितीला चालना

## माजी राजदूत दीपक वोहरा यांचे मत; फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडियातर्फे चर्चासत्र

पुणे (दै. संध्या)

"आपला भारत देश तंत्रज्ञान, उद्योग, सुरक्षा, अवकाश संशोधनातून स्वतंत्र ओळख निर्माण करीत असून, सक्षम अर्थव्यवस्था म्हणून जागतिक स्तरावर स्थान बळकट करीत आहे. भारताची प्रतिमा एक सक्षम, विश्वासार्ह आणि वेगाने प्रगती करणारा देश अशी तयार होत आहे. फायर सेफ्टी आणि सिक्युरिटी क्षेत्रातील कामगिरीही याला अपवाद नाही. त्यातून राष्ट्रनिर्मितीला चालना देण्याचे काम होत आहे," असे प्रतिपादन भारताचे माजी राजदूत व परराष्ट्र सेवेतील निवृत्त अधिकारी दीपक वोहरा यांनी केले.



फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) पुणे चॅप्टरच्या वतीने ‘सुरक्षित भारत’ या विषयावरील चर्चासत्रात दीपक वोहरा बोलत होते. वाकड येथील हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल येथे आयोजित या चर्चासत्र ‘सुरक्षित भारत’ घडवण्यासाठी तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर, नियमांचे काटेकोर पालन आणि सर्व स्तरांवर जागरूकता वाढवण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. तसेच यावेळी 'एफएसएआय'च्या डायरीचे प्रकाशन करण्यात आले. वोहरा व पोटफोडे यांच्या हस्ते १२ मान्यवरांचा उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला.


कार्यक्रमावेळी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे, एक्स बझ फायर अँड सिक्युरिटीचे संचालक चिंटू आशेर, 'एफएसएआय' पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सुजल शहा, सचिव सागर मुनीश्वर, सिम्पल जैन, प्रदेश संचालक वरुण तिवारी, संयोजक केदार देशमुख, शिवम फायरवाला, विनायक जोगळेकर, अजित यादव, अमोल उंबरजे, ऋतुराज कुलकर्णी, सागर कुलकर्णी यांच्यासह उद्योग, बांधकाम आणि सुरक्षा क्षेत्रातील तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीपक वोहरा यांनी भारत आणि इतर देशांमधील संबंधांवर, भारताच्या क्षमतेवर विचार मांडले. आज भारत स्वयंपूर्णतेकडे जात असून, सुरक्षा क्षेत्रातही मोठी प्रगती करत आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करून सुरक्षित भारतासाठी विविध उपाययोजना करण्यावर आपले लोक काम करताहेत, याचे समाधान वाटत असल्याचे वोहरा म्हणाले. फायर सेफ्टी आणि सिक्युरिटी क्षेत्रातील कंपन्या अत्याधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि नवकल्पनांच्या माध्यमातून भारताला आत्मनिर्भर बनवण्यास हातभार लावत आहेत.

देवेंद्र पोटफोडे म्हणाले, "आधुनिक बांधकाम क्षेत्रात आकर्षक रचना, उंच इमारती आणि काचेच्या संरचनांचा वापर वाढत आहे. मात्र, लक्षवेधक बांधकाम करण्याच्या प्रयत्नात सुरक्षेच्या बाबतीत तडजोड होऊ नये. आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्याच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजनांची तरतूद बांधकाम करताना व्हायला हवी. सेफ्टी सर्टिफिकेशन केवळ औपचारिकता न राहता त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे."

चिंटू आशेर यांनी बदलत्या व्यावसायिक वातावरणातील आव्हानांवर भाष्य केले. बाजारातील अनिश्चितता आणि तांत्रिक बदल लक्षात घेता उद्योजकांनी ‘प्रॉब्लेम सॉल्व्हर’ बनणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अडचणी या संधींमध्ये रूपांतरित करून सातत्याने नवकल्पना स्वीकारणे हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी नमूद केले.

विशेष चर्चासत्रामध्ये गणेश जाधव, देवेंद्र पोटफोडे, शैलेश धनाने, सुभाष खानडे, नरेंद्र दिवेदी यांनी सहभाग घेतला. सुजल शहा यांनी स्वागत-प्रास्ताविक केले.



## कोलंबो परिषदेसाठी सुनील शिंदे यांची निवड

पुणे (दै. संध्या)

पुणे येथील नगरसेवक आणि कामगार नेते श्री सुनील शिंदे यांची निवड यु एन आय ग्लोबल युनियनद्वारे श्रीलंकेतील कोलंबो येथे होणाऱ्या असंघटित कामगारांच्या परिषदेसाठी करण्यात आली आहे. ही परिषद 27, 28, आणि 29 तारखेला कोलंबो येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या परिषदेसाठी भारत, श्रीलंका, नेपाळ आणि पाकिस्तान येथील विविध कामगार प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले आहे. परिषदेमध्ये आरोग्य विभागात कार्यरत असंघटित कामगारांबाबत महत्त्वपूर्ण चर्चा होणार असून, विविध देशांमध्ये काम करणाऱ्या असंघटित कामगारांच्या कायद्याविषयी सखोल माहिती देण्यात येईल.

सुनील शिंदे यांची परिषदेसाठी निवड ही त्यांच्या कामगार चळवळीतल्या योगदान आणि कामकाजातील प्रभावी नेतृत्वामुळे झाली आहे. या परिषदेमध्ये सुनील शिंदे विविध मुद्द्यांवर आपले विचार मांडतील आणि असंघटित कामगारांच्या हक्कांचे संरक्षण कसे केले जाऊ शकते, यावर चर्चा करणार आहेत. या परिषदेमध्ये असंघटित कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी विविध योजना, धोरणे आणि जागरूकता निर्माण करण्यावर विशेष लक्ष दिले जाईल.

## राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेत सहभाग नोंदविण्याचे आवाहन

पुणे (दै. संध्या)

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या 'ज्ञानभारतम्' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिम १६ मार्च २०२६ पासून सुरु आहे, नागरिकांकडे असलेल्या हस्तलिखितांची माहिती ज्ञानभारतम् या मोबाईल अॅपवर अपलोड करुन राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

भारताला हस्तलिखितांचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. पारंपारिक ज्ञान हे पिढीदर पिढी या हस्तलिखितांद्वारे प्रसारित होत आलेले आहे. परंतू हे सर्व हस्तलिखिते जागोजागी विखुरलेल्या स्वरुपात आहेत. या हस्तलिखिताचे ज्ञानभंडार एकत्र करुन एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीने भारत सरकारने ज्ञानभारतम् या प्रकल्पाची आखणी केली आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश भारतातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था,संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खासगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. यामध्ये हस्तलिखितांची मालकी ही संबंधित संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांचीच राहणार आहे. परंतू ही हस्तलिखिते स्वखुशीने शासनाकडे सुपूर्द करावायाची झाल्यास शासन स्वीकारणार आहे.



या सर्वेक्षणासाठी ज्ञानभारतम् प्रकल्पांतर्गत "Gyan Bharatam" हे मोबाईल अॅप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत, यामध्ये कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर क्लस्टर केंद्र, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे क्लस्टर केंद्र, आनंद आश्रम संस्थान, पुणे - स्वतंत्र केंद्र, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे स्वतंत्र केंद्राचा समावेश करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून राज्य नोडल अधिकारी म्हणून सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय तसेच अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था, तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून कामकाज करणार आहेत.

या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, तसेच एनसीसी, एनएसएस स्वयंसेवक, विद्यार्थी व वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्ह्यात ज्ञानभारतम् प्रकल्पासाठी जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे, तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेणे याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

# ‘सीएमए’ विद्यार्थी व सदस्यांसाठी स्वतंत्र 'हेल्पडेस्क'ची सुविधा

## सीएमए टीसीए श्रीनिवासा प्रसाद यांची माहिती; 'आयसीएमएआय'तर्फे केंद्रीय व विभागीय पदाधिकाऱ्यांचा सत्कार

पुणे (दै. संध्या)

"कॉस्ट अँड मॅनेजमेंट (सीएमए) क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी असून, विद्यार्थ्यांचा या अभ्यासक्रमाकडे कल वाढला आहे. दिवसेंदिवस सीएमए करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. विद्यार्थ्यांच्या व सदस्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी संस्थेच्या वतीने स्वतंत्र हेल्पडेस्कची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याबरोबरच प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता व सुलभता आणली जात आहे," अशी माहिती दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स ऑफ इंडियाचे




(आयसीएमएआय) राष्ट्रीय अध्यक्ष सीएमए टीसीए श्रीनिवासा प्रसाद यांनी केले. सीएमए व्यवसायाच्या सक्षमीकरणासाठी संस्थेचे नेतृत्व आणि सदस्य यांच्यातील सातत्यपूर्ण संवाद, ज्ञानविनिमय आणि कौशल्यवृद्धी महत्त्वाची ठरते, असेही त्यांनी नमूद केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएमएआय) पुणे चॅप्टरच्या वतीने केंद्रीय व विभागीय समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या सत्कार व संवाद सोहळ्यात श्रीनिवासा प्रसाद बोलत होते. कर्वेनगर येथील सीएमए भवनात झालेल्या कार्यक्रमावेळी 'आयसीएमएआय'चे राष्ट्रीय उपाध्यक्ष सीएमए नीरज जोशी, केंद्रीय समिती सदस्य सीएमए नवनीत जैन, सीएमए आशिष थत्ते, पश्चिम विभागीय समितीचे सचिव सीएमए चैतन्य मोहरीर, उपाध्यक्ष सीएमए नॅन्टी शाह, पुणे चॅप्टरचे अध्यक्ष सीएमए श्रीकांत ईप्पलपल्ली, उपाध्यक्ष सीएमए राहुल चिंचोळकर, सचिव सीएमए हिमांशू दवे, खजिनदार सीएमए तनुजा मंत्रवादी, 'आयसीएमएआय'चे माजी अध्यक्ष सीएमए डॉ. धनंजय जोशी, पुणे चॅप्टरचे सल्लागार सीएमए डॉ. संजय भार्गवे यांच्यासह सीएमए सदस्य उपस्थित होते.

सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली यांनी स्वागत-प्रास्ताविकात चॅप्टरतर्फे राबविण्यात आलेल्या विविध व्यावसायिक आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांची माहिती दिली. सेमिनार, कार्यशाळा आणि विद्यार्थी विकास कार्यक्रमांमुळे संस्थेची, तसेच पुणे चॅप्टरची प्रतिमा आणि ओळख अधिक बळकट झाली आहे. हीरक महोत्सवी वर्षात संस्थेने सदस्य व विद्यार्थ्यांसाठी राबविलेले उपक्रम महत्वपूर्ण ठरले असून, हा प्रवास अभिमानास्पद आहे.

सीएमए नीरज जोशी यांनी 'आयसीएमएआय'चे मुख्यालय कोलकाता येथून दिल्ली येथे स्थलांतरित झाल्यानंतर संस्थेच्या कामकाजाच्या गतीत झालेल्या वाढीबाबत माहिती दिली. यामुळे शासकीय कार्यालयांशी तातडीने संपर्क साधणे अधिक सुलभ झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. हे सत्र सदस्यांना संस्थेच्या नेतृत्वाशी संवाद साधण्यासाठी, भावी दिशा समजून घेण्यासाठी आणि सीएमए व्यवसायाच्या प्रगतीसाठी आपली बांधिलकी अधिक दृढ करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. सीएमए आशिष थत्ते यांनी श्रीनिवासा प्रसाद व नीरज जोशी यांच्या कुशल व सक्षम नेतृत्वामुळे प्रशासकीय नियंत्रण अधिक प्रभावी झाले असून, कार्यक्षेत्रात नव्या संधींचा शोध घेण्यासाठी अधिक स्वातंत्र्य मिळाल्याचे सांगितले. सीएमए नवनीत जैन यांनी सहकारी क्षेत्रातील अलीकडील घडामोडींविषयी तसेच सहकारी बँकिंग क्षेत्रातील अद्ययावत माहिती दिली. तसेच या क्षेत्रात सीएमए व्यावसायिकांची वाढती भूमिका अधोरेखित केली.

# शाहिरी आणि कीर्तन हे समृद्ध परंपरेची दोन भक्कम अंग

## राष्ट्रीय कीर्तनकार डॉ.चारुदत्त बुवा आफळे यांचे मत : लोकपरंपरा पुरस्कार शाहीर हेमंत मावळे यांना प्रदान

पुणे (दै. संध्या)

■ वीर मारुती चौक येथील २०० वर्षांची कीर्तन परंपरा : शाहिरी परंपरेच्या जतनासाठी केलेल्या कार्याबद्दल सन्मान

कीर्तनकारांनी देखील शाहिरीवर मनापासून प्रेम केले आहे. शाहिरी आणि कीर्तन ही आपल्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेची दोन अत्यंत भक्कम आणि प्रभावी अंग आहेत. या दोन्ही कलाप्रकारांनी समाजप्रबोधन, संस्कार आणि जनजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे, असे मत राष्ट्रीय कीर्तनकार डॉ.चारुदत्त बुवा आफळे यांनी व्यक्त केले.

शनिवार पेठेतील वीर मारुती चौक येथे शनिवार वीर मारुती उत्सव मंडळाच्या पुढाकाराने आणि गुरुवर्य श्रीराम धोंडूराम दहाड यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'लोकपरंपरा पुरस्कार' देण्याची परंपरा सुरू झाली आहे. या वर्षीचा 'लोकपरंपरा पुरस्कार' आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी गोपालकृष्ण दहाड, महेश पानसे, सचिन दाते, मयुरेश जोशी, अॅड.प्रवीण जोशी, शकुंतला दहाड, राम दहाड व सहकारी मंडळी उपस्थित होते.

शाहीर हेमंत मावळे म्हणाले, सन १९८२ पासून गेली ४४ वर्षे मी शाहिरी क्षेत्रामध्ये काम करत आहे. एखादे काम करणे इतके सोपे नसते. त्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते. काम केले, तरच माणसाला किंमत मिळते हे आज मिळालेल्या पुरस्कारांमधून सिद्ध होत आहे. हा परंपरेसाठीचा पुरस्कार आहे, आणि परंपरा जपण्यासाठी माणसाने जर आयुष्य घातले, तरच त्याला कुठेतरी एक स्थान मिळते. आदर्श शिक्षक स्व श्रीरामजी दहाड यांचे स्मृतिप्रित्यर्थ त्यांचे नावाने पुरस्कार मिळतोय याचाही सार्थ अभिमान आहे. कीर्तन आणि शाहिरी या दोन्ही परंपरा नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोघांनीही एकच काम केले आहे. कीर्तनातून भक्ती सांगितली जाते, तर शाहिरीतून वीररसातून देशभक्ती जागवली जाते. राम दहाड म्हणाले, शनिवार पेठेत पेशवे काळापासून सुरू असलेली आणि आजही अखंडपणे जपली जाणारी कीर्तन परंपरा यंदाही हनुमान जयंतीपासून अक्षयतृतीया पर्यंत सलग १८ दिवस साजरी झाली. महाराष्ट्रातील सलग १८ दिवस कीर्तन उत्सव सुरु असणारे हे बहुधा एकमेव मारुती मंदिर मानले जाते. महाराष्ट्रातील लोप पावत चाललेल्या परंपरांना जपणे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी काम करणा-या व्यक्तींना सन २०२४ पासून 'लोकपरंपरा पुरस्कार' देण्यात येतो. आचार्य शाहीर हेमंत मावळे यांनी शाहिरी परंपरेच्या जतनासाठी अथक प्रयत्न केले आहेत. तसेच विनामूल्य पोवाडे प्रशिक्षण वर्गाच्या माध्यमातून ही परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहे. ही परंपरा अधिक जिवंत राहावी यासाठी त्यांना सन्मानित करण्यात आले.




## थोडक्यात पण महत्वाचे...



### चाकणच्या नगराध्यक्षांकडून संजीवन समाधीस चंदन उटी अभिषेक

चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा व खेडचे माजी आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे यांच्या पत्नी मनीषा गोरे यांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधीस चंदन उटी अभिषेक केला. देवाची आळंदी येथे गुरुपुष्य अमृत मुहूर्तावर नगराध्यक्षा मनिषा गोरे यांना अभिषेक करण्याचा योग आला. श्री संत ज्ञानेश्वर संस्थानचे पुजारी हभप. राजाभाऊ चौधरी यांच्या मंत्रोपचार उदघोषनाणे मनिषा गोरे यांनी अभिषेक केला. याप्रसंगी उद्योजक विकास गोरे, निकिता गोरे, संत ज्ञानेश्वर चरित्र समितीचे अध्यक्ष हभप. प्रकाश काळे, संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगावकर, सचिव अजित वडगावकर, हभप. कैलास महाराज आव्हाळे, हभप. घुंडरे महाराज, हभप. दाजी काका, प्रमिला गोरे आदी उपस्थित होते. यावेळी संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगावकर यांनी माजी आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे यांच्या आठवणींना उजाळा देत गोरे यांच्या कार्याचा गौरव केला. सचिव अजित वडगावकर यावेळी म्हणाले, नगराध्यक्ष पदाच्या माध्यमातून मनीषा गोरे या चाकणच्या विकासाचा आलेख उंचावता ठेवतील.

### डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरच्या हल्ल्यामुळे काश पटेल यांची उचलबांगडी होणार?



मुंबई (दैनिक संध्या) : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनातील अंतर्गत कलह पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. एफबीआय (FBI) संचालक काश पटेल यांची लवकरच पदावरून हकालपट्टी केली जाऊ शकते, असा दावा एका ताज्या अहवालात करण्यात आला आहे. भारतीय वंशाचे काश पटेल हे ट्रम्प यांचे अत्यंत कट्टर समर्थक मानले जातात, मात्र गेल्या काही महिन्यांपासून ते विविध वादांच्या भोवऱ्यात अडकले आहेत. वॉशिंग्टन येथील 'व्हाईट हाऊस करस्पाँडंट्स डिनरमध्ये गोळीबार करण्यात आला. या घटनेनंतर एकच खळबळ उडाली. या कार्यक्रमात अमेरिकेतील अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. मोठी सुरक्षा व्यवस्था तैनात असतानाही अशा प्रकारची घटना घडल्याने अमेरिकेत मोठी खळबळ उडाली आहे. 'पॉलिटिको' आणि 'द अटलांटिक' यांसारख्या प्रतिष्ठित माध्यम संस्थांच्या रिपोर्टनुसार, काश पटेल यांचे पद आता धोक्यात आले आहे. त्यांच्यावरील कारवाईमागे प्रामुख्याने त्यांच्या मद्यपानाच्या सवयीशी संबंधित वाद कारणीभूत असल्याचे म्हटले जात आहे. पटेल यांनी स्वतः मान्य केले आहे की, त्यांच्या तरुणपणात सार्वजनिक ठिकाणी मद्यपान केल्याप्रकरणी त्यांना दोनदा अटक झाली होती. 'द अटलांटिक'ने त्यांच्यावर कामाच्या ठिकाणीही मद्यधुंद अवस्थेत राहिल्याचा आरोप केला आहे, ज्या विरोधात पटेल यांनी २५० दशलक्ष डॉलर्सचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे. काश पटेल यांच्या मद्यपानाच्या कथित सवयीमुळे डेमोक्रॅट पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. हाऊस ज्युडिशियरी कमिटीतील सदस्यांनी पटेल यांची अल्कोहोल स्क्रीनिंग टेस्ट करण्याची मागणी केली आहे. "त्यांच्या मद्यपानाच्या सवयीमुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो," असा आरोप विरोधकांनी केला आहे. मात्र, पटेल यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावत, आपण कर्तव्यावर असताना कधीही नशेत नसल्याचे स्पष्ट केले आहे.

### भाजपाच्या सभेच्या आवाजामुळे ममता बॅनर्जी यांनी सोडलं अर्धवट भाषण

मुंबई (दैनिक संध्या) : पश्चिम बंगालमध्ये सध्या विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रचाराची धामधूम सुरू आहे. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान २३ एप्रिल रोजी पार पडलं आहे. त्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यातील प्रचार सुरू असून तृणमूल काँग्रेस, भाजपा आणि काँग्रेससह सर्वच पक्षाचे नेते निवडणुकीच्या प्रचारात उतरलेले आहेत. या प्रचाराच्या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण रंगल्याचं पाहायला मिळत आहे. यातच आज (२६ एप्रिल) पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या एका सभेत बोलत असताना अचानक संतापल्या असल्याचं पाहायला मिळालं आहे. पश्चिम बंगालच्या भवानीपूरमध्ये एक निवडणूक रॅली सुरू होती. मात्र, यावेळी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी निषेध म्हणून स्वत:ची जाहीर सभा थांबवली आणि त्या व्यासपीठावरून त्यांचं भाषण अर्धवट सोडून निघून गेल्या. या सभेच्या जवळच भाजपाची रॅली सुरू होती आणि त्या रॅलीतील आवाज मोठ्या प्रमाणात येत असल्याने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना भाषण करताना व्यत्यय निर्माण होत होता. त्यामुळे ममता बॅनर्जी यांनी संताप व्यक्त केला. त्या म्हणाल्या की, "ते मुद्दाम गोंधळ घालण्याचा प्रयत्न करत आहेत. ते माझ्या आजूबाजूला गोंगाट आणि गोंधळ करण्याचा प्रयत्न करत आहेत, जेणेकरून मी ही रॅली आणि सभा घेऊ शकणार नाही." "माझ्या आई, बहिणी आणि भावांनो, कृपया मला माफ करा. मी उद्या या परिसरात पुन्हा एक रॅली घेणार आहे. मात्र, असं निर्लज्ज वर्तन मी सहन करू शकत नाही. हे अत्यंत अपमानजनक आणि लज्जास्पद आहे. व्यासपीठावरून जाण्यापूर्वी मी तुम्हा सर्वांची माफी मागते", असं म्हणत भर सभेत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी संताप व्यक्त केला आणि भाजपाच्या सभेच्या आवाजामुळे स्वत:चं भाषण अर्धवट सोडून निघून गेल्या.

### षटकार भारतीय संघाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या जेतेपदापासून दूर ठेवणार?

मुंबई (दैनिक संध्या) : समजा भारताला यंदा वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची फायनल गाठता आली नाही आणि असं का झालं याची कारणमीमांसा बीसीसीआयला करायची असेल तर त्यांनी लखनौमध्ये झालेला आयपीएलचा एक सामना केसस्टडी म्हणून पाहावा. टेस्ट क्रिकेट अस्तंगत होतंय, मगरीचे अश्रू ढाळत काही चाहते बोलत असतील तर लखनौ-राजस्थान सामन्यात टेस्ट खेळणाऱ्या काही खेळाडूंचे फटके तुम्ही नक्कीच पाहायला हवेत. अर्थात यात चकित होण्यासारखं, धक्का बसेल असं काहीही नाही. हे होणारच होतं. याच सामन्यादरम्यान मोहम्मद शमीने घेतलेल्या दोन विकेट्स भारताच्या टेस्ट खेळणाऱ्या फलंदाजांना येत्या काळात काय अडचणींना सामोरं जावं लागेल याचं प्रतीक होतं. भारतासाठी टेस्ट खेळलेल्या विकेटकीपर फलंदाज ध्रुव जुरेलला ३५ शमीने चेंडू टाकला. चेंडू टप्पा पडल्यानंतर स्विंग झाला आणि ऑफस्टंपच्या थोड्या बाहेरच्या बाजूने निघाला. जुरेलने चेंडू खेळला. चेंडू त्याच्या बॅटची कड घेऊन अलगद विकेटकीपरच्या ग्लोव्ह्जमध्ये जाऊन विसावला. शमीने टाकलेल्या त्या चेंडूचं कॉमेंटेटर्सनी प्रचंड कौतुक केलं, जणू शतकातला सर्वोत्तम चेंडू टाकला अशा थाटात. तो चेंडू खासच होता. ज्या पद्धतीने टप्पा पडून चेंडू हलकेच बाहेरच्या दिशेने स्विंग झाला आणि जुरेल त्या सापळ्यात अडकला. शमी आणि चेंडूने दिलेला गुंगारा जुरेलला झेपला नाही.

# सारसबागेची 'शाहीनबाग' होऊ देणार नाही

**पुण्यात हिंदुत्वनिष्ठ संघटना आक्रमक! | बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर सारसबागेत प्रतिबंधात्मक आदेश काढा; प्रशासकीय अपयशाचा आंदोलकांकडून निषेध**

पुणे (दै. संध्या) :




ऐतिहासिक आणि समस्त हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या सारसबाग व श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराचे पावित्र्य जपण्यासाठी आज हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला. रमजानच्या काळात या परिसरात झालेल्या प्रचंड गर्दीच्या पार्श्वभूमीवर, प्रशासकीय अपयशाचा निषेध करण्यासाठी आणि सारसबागेची 'शाहीनबाग' होऊ न देण्याचा निर्धार करत आज येथे विविध हिंदू संघटनांचे 'हिंदु राष्ट्र जागृती आंदोलन' उत्स्फूर्तपणे पार पडले. या वेळी आंदोलकांनी आगामी २७ मे रोजीच्या बकरी ईदसाठी आतापासूनच प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याची आग्रही मागणी प्रशासनाकडे केली.

२२ मार्च रोजी रमजानच्या काळात हजारोंच्या संख्येने येथे जमाव गोळा होणे, ही बाब अत्यंत गंभीर आहे. पेशवेकालीन वारसा लाभलेल्या या पवित्र स्थळाची सुरक्षा राखण्यात प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे. "ही सारसबाग आहे की शाहीनबाग?" असा संतप्त सवाल या वेळी उपस्थित करत या घटनेमुळे हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. आंदोलनाद्वारे विविध मागण्या करण्यात आल्या. त्यामध्ये २२ मार्चच्या गर्दीला परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची तात्काळ चौकशी करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, आगामी काळात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.सारसबाग मंदिर परिसरात कोणत्याही बिगर-हिंदू सामूहिक कार्यक्रमांना कायमस्वरूपी बंदी घालण्यात यावी.२७ मे रोजी होणाऱ्या बकरी ईदच्या काळात सारसबागेत गर्दी, मांसाहार किंवा कोणताही अनुचित प्रकार टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश त्वरित काढावेत. या घटना म्हणजे केवळ योगायोग नसून पद्धतशीर धार्मिक अतिक्रमणाचे संकेत आहेत, त्यामुळे शासनाने याकडे अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने गांभीर्याने पाहावे.

या आंदोलनात विश्व हिंदू परिषदेचे श्री. दादा वेदक, सीए श्री. सर्वेश मेहेंदळे, पतित पावन संघटनेचे श्री. स्वप्नील नाईक, स्वातंत्र्यवीर सावरकर विचार मंचचे श्री. विद्याधर नारगोलकर, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे ह.भ.प. दत्तात्रय चोरघे महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर युवा विचार मंचचे श्री दयानंद बंडगर, हिंदु जनजागृती समितीचे श्री. पराग गोखले यांसह अनेक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देऊन, सामूहिक आरतीने आंदोलनाची सांगता करण्यात आली.

## राज्यात अपघातांच्या प्रमाणामध्ये सात टक्क्यांनी घट

अकोला (दै. संध्या) :

राज्यात रस्ते वाहतुकीमध्ये सुधारणा झाल्याचे चित्र असून प्राणघातक अपघातांच्या संख्येत सात टक्क्यांनी घट नोंदवल्या गेली. अपघाती मृत्युची संख्या देखील मागील वर्षीच्या तुलनेत आठ टक्क्यांनी कमी झाली. गेल्या वर्षीच्या तुलनेत जानेवारी ते मार्च दरम्यानच्या आकडेवारीतून हे स्पष्ट झाले. परिवहन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. २०२६ वर्षांत जानेवारी ते मार्च महिन्यातील आकडेवाडीनुसार, राज्यात प्राणघातक अपघातांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत २८४ (७ टक्के) ने कमी व अपघाती मृत्युंची संख्या गत वर्षीच्या तुलनेत ३२१ (८ टक्क्याने) ने कमी झाली. राज्यात २०२५ मध्ये जानेवारी ते मार्चदरम्यान अपघात नऊ हजार ३८५ झाले असून प्राणघातक अपघातांची संख्या तीन हजार ८७८ आहे. यामध्ये चार हजार १७९ जणांचा मृत्यू झाला. या वर्षी २०२६ मध्ये पहिल्या तीन महिन्यांत नऊ हजार २५९ अपघात झाले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत १२६ अपघात कमी झाले. प्राणघातक अपघातांची संख्या तीन हजार ५९४ असून त्यामध्ये तीन हजार ८५८ प्रवाशांचा मृत्यू झाला. जानेवारी ते मार्च या कालावधीत गेल्या वर्षीच्या तुलनेत वाशीम जिल्ह्यात ४८ टक्के अपघाती मृत्युचे प्रमाण कमी झाले. त्या खालोखाल बीड ३३ टक्के, नांदेड ३० टक्के, गडचिरोली २९ टक्के, नाशिक शहर २८ टक्के, नागपूर ग्रामीण व शहर प्रत्येकी २७ टक्के, सिंधुदूर्ग २६ टक्के, मुंबई २६ टक्के, अकोला २० टक्के, नवीमुंबई १९ टक्के, धाराशीव १७ टक्के, चंद्रपूर १५ टक्क्यांनी अपघाती मृत्यू संख्या कमी झाली आहे.

## पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी दिले आजीला तिच्या घराचा ताबा

*लक्ष्मीनगरमध्ये सामाजिक सलोख्याचे दर्शन; घराचा ताबा घेतलेल्याला हि  बेघर होऊन दिले नाही*

पुणे (दै. संध्या) :



येरवडा लक्ष्मीनगर येथील एका निराधार ज्येष्ठ महिलेच्या घरावर एकाने  ताबा घेतला होता . याची फिर्याद घेऊन ज्येष्ठ महिला लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात गेल्या. मात्र सुरवातीला पोलीसानी त्यांना हुसकावून पाठिविले. एखाद्याला घरातून बाहेर काढणे व एखाद्याला घराचा ताबा देणे हे पोलीसांचे काम नाही असे पोलिसानी सांगितले गेले . मात्र वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र कदम यांनी हे प्रकरण संवेदनशीलतेने हाताळून ज्येष्ठ महिलेला त्यांचा घराचा ताबा तर दिलाच  यासह त्यांचे घराचा ताबा घेतलेल्याला हि  बेघर होऊन दिले नाही.

पोलीसाच्या गणवेशातील माणुसकीचे दर्शन लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात नुकतेच दिसून आले .  सुरेखा भोसले या  ज्येष्ठ महिलेचे घर लक्ष्मीनगर येथील भिमक्रांती मित्र मंडळ चौकात होते. घर हे मोडकळीस आल्यामुळे भोसले नातेवाईकांकडे राहत होत्या. याचा गैरफायदा घेऊन बाबू चौधरी या व्यक्तीने घराचा बेकायदा ताबा घेतला होता. गेली अनेक दिवस भोसले घर मिळवण्यासाठी लोकप्रतिनिधींच्या घरांचे  उंबरे झिजवत होत्या. पोलीस हि दाद देत नव्हते.

दरम्यान हे प्रकरण लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी समजून घेतले. भोसले यांच्याकडे घराच्या महापालिकेच्या ग व नी ची  कर भरलेली पावती होती. बाबुला घरातून काढायचे तर त्याला पत्नी, दोन मुलगे, एक मुलगी व आई असा परिवार होता. कदम यांनी अॅडव्होकेट दिलीप कुऱ्हाडे यांचा सल्ला घेतला. त्यांनी बाबू चौधरीसुद्धा नुकसान नको अशी भूमिका घेत आपण लोकवर्गणीतून काही रक्कम चौधरीला दिले तर तो भोसले यांचे घर सोडून दुसरीकडे भाड्याने राहील व भोसले यांचे घर त्याना मिळेल हा मध्यम मार्ग काढला.

हि बाब समजताच आर्थिक मदतीसाठी आजी- माजी नगरसेवक तसेच कार्यकर्ते पुढे आले. नगरसेवक अॅड. अविनाश साळवे,माजी नगरसेवक हनिफ शेख, माजी नगरसेवक किशोर विटकर, सामाजिक कार्यकर्ते अजय जानराव, जॉर्ज स्वामी, श्रीकांत ओझर्डेकर, सुनील लोखंडे, लतिफ माहुत,  अन्वर पठाण, अहमद शेख, मुनीर शेख, जयंत चव्हाण आदींनी आर्थिक मदत चौधरीला दिली. त्यामुळे चौधरी घर सोडण्यास तयार झाला आणि सुरेखा भोसले यांना हक्काचे घर मिळाले. हे प्रकरण पोलीस निरीक्षक रवींद्र कदम यांनी संवेदनशीलपने हाताळले त्यामुळे परिसरात त्यांचे कौतूक होत आहे.

# दुग्धव्यवसायाचा हवामानावर होणारा परिणाम अधोरेखित करत तरुणाई रस्त्यावर

पुणे (दै. संध्या) :




भारतातील दूध व्यावसाय हा बीफ (गोमांस) निर्यातीला थेट बळ देतो,  हे सांगत पुण्यातील तरुणाई आज रस्त्यावर उतरली. 'पृथ्वी दिना'चे औचित्य साधून प्राणी हक्क कार्यकर्ते आज रस्त्यावर उतरले. अन् जगातील सर्वात मोठ्या दूध उत्पादक व्यवस्थेचे वास्तव नांगरिकां समोर मांडले. त्यांनी  पुण्यातील जंगली महाराज रस्त्यावरील संभाजी उद्यानासमोर चित्रप्रदर्शन आणि निदर्शना द्वारे जनजागृती केली.

सध्या देशातील २० शहरांमध्ये हे युवक "दूध आणि मांस एकाच प्राण्याकडून येते" या वास्तवाकडे लक्ष वेधून घेत आहे. नागरिकांनी दुग्धव्यवसाय साखळीतून प्राण्यांचा प्रवास आणि शेवटी त्यांची मांस बाजारात होणारी विक्री यावर विचार करावा, असे आवाहन याद्वारे करण्यात आले. दुग्धव्यवसायामुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या हानीवर विचार करण्यास देखील त्यांनी यावेळी भाग पाडले. भारतात एक लिटर दूध उत्पादनासाठी १०७८ लिटर पाणी लागते, जे आधीच पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या देशासाठी मोठे संकट आहे. तसेच, पशुधनातून होणारे मिथेन उत्सर्जन हे जागतिक तापमानवाढीचे प्रमुख कारण मानले जात आहे, याकडे देखील यावेळी लक्ष वेधण्यात आले.  पुण्यातील प्राणी हक्क आणि पर्यावरण कार्यकर्त्यांनी या मोहिमेदरम्यान आपली परखड मते मांडली. हर्षल मगरे (प्राणी हक्क कार्यकर्ते) म्हणाले,  "भारताला आता या अस्वस्थ करणाऱ्या सत्याचा सामना करावाच लागेल की दुग्ध आणि गोमांस (बीफ) उद्योग या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश म्हणून, आपण गोमांस निर्यातीतही जगात आघाडीवर आहोत. कारण जेव्हा दुभती जनावरे 'अनुत्पादक' ठरतात, तेव्हा त्यांना अपरिहार्यपणे कत्तलखान्यात पाठवले जाते. आपण पित असलेला दुधाचा प्रत्येक घोट या कत्तलखान्यांना नकळतपणे आर्थिक पाठबळ देत असतो." ट्विंकल ओसवाल(प्राणी हक्क कार्यकर्ते) म्हणाले, "पुणे शहर सध्या भीषण पाणीटंचाई आणि उष्णतेच्या लाटेचा सामना करत आहे, तरीही आपण यामागच्या मुख्य कारणाकडे म्हणजेच प्राणी आधारित शेती आणि दुग्ध व्यवसायाकडे - डोळेझाक करत आहोत. केवळ एक लिटर दुधासाठी हजारो लिटर पाणी वाया जात असेल, तर आपल्या आहाराच्या सवयी हा आता हवामान बदलाचा एक अतिशय गंभीर प्रश्न बनला आहे. जर आपल्याला पुण्याचे भविष्य सुरक्षित आणि हवामान-अनुकूल ठेवायचे असेल, तर दुग्धजन्य पदार्थांचा त्याग करणे हा आता केवळ एक पर्याय उरलेला नसून, ती पर्यावरणाची अत्यंत तातडीची गरज बनली आहे." प्रसाद सूर्यवंशी(प्राणी हक्क कार्यकर्ते) म्हणाले,"एक समाज म्हणून आपण दुधाच्या नावे चालणाऱ्या हिंसाचार आणि शोषणाच्या वास्तवापासून भयानक रित्या दुरावलो आहोत. आपण सांस्कृतिकदृष्ट्या या प्राण्यांची पूजा करतो, परंतु आपल्या दैनंदिन उपभोगाच्या सवयी नकळतपणे आणि निमूटपणे त्यांच्या आयुष्यभराच्या वेदनांना आणि शोषणाला निधी पुरवत आहेत. हा ७ फुटी देखावा आपल्या सामूहिक सदसद विवेकबुद्धीला दाखवलेला एक आरसा आहे, जो आपल्याला आपल्या कृती खऱ्या अर्थाने करुणेच्या मूल्यांशी जोडण्याचे आवाहन करतो."

जसजशी पाणीटंचाई वाढत आहे आणि तापमान उच्चांक गाठत आहे, तसतसे अन्नसुरक्षेचे प्रश्न आपण गृहीत धरू शकत नाही. आता धोरणकर्ते, सरकारी संस्था आणि दुग्ध उद्योगांना हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे की: भारतातील अन्न व्यवस्था या निर्माण झालेल्या हवामान आणि नैतिक आव्हानांना कसा आणि कधी प्रतिसाद देणार? 'पुणे ॲनिमल लिबरेशन' बद्दल (About Pune Animal Liberation): 'पुणे ॲनिमल लिबरेशन' ही तळागाळातून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखालील एक प्रमुख प्राणी हक्क संघटना आहे. ही संघटना पशुपालनामुळे (Animal Agriculture) होणाऱ्या पर्यावरणीय आणि नैतिक परिणामांबाबत जनजागृती करण्यासाठी सातत्याने प्रभावशाली कार्यक्रम, मोहिमा, शांततापूर्ण आंदोलने आणि शैक्षणिक उपक्रम राबवते; तसेच समाजाला एका न्याय्य, शाश्वत आणि करुणामयी अन्न व्यवस्थेकडे वळण्यासाठी प्रवृत्त करते.

## "आपली बस, आपली सेवा" १ मे पासून एसटीचे नवे अभियान

मुंबई (दै. संध्या) :

**नव्या विश्वासाचा प्रवास**

१ मे २०२६ पासून राज्यभर राबविण्यात येणारे हे अभियान केवळ सेवा सुधारण्याचा उपक्रम नसून, एसटी आणि प्रवासी यांच्यातील विश्वासाचा नवा सेतू ठरणार आहे. लालपरीच्या चाकांना आता केवळ वेग नाही, तर संवेदनशीलतेचीही दिशा मिळणार आहे. "आपली बस, आपली सेवा" हा मंत्र प्रत्यक्षात उतरला, तर प्रत्येक प्रवास हा केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचा मार्ग न राहता—एक सुखद, सन्मानपूर्वक आणि समाधानकारक अनुभव ठरेल. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

**- (अभिजीत भोसले) जनसंपर्क अधिकारी मा. मंत्री परिवहन**

महाराष्ट्राच्या जनजीवनाशी नाळ जोडलेली लालपरी आता नव्या उमेदीनं, नव्या शिस्तीनं आणि नव्या संवेदनशीलतेनं प्रवासाला सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने "आपली बस आपली सेवा" या व्यापक अभियानाच्या माध्यमातून प्रवासी सेवेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे. त्यानुसार एसटी महामंडळाच्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सविस्तर परिपत्रक जारी केले आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटी बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासीसंख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नसल्याची जाणीव महामंडळाने गांभीर्याने घेतली आहे. याच जाणिवेतून प्रवाशांचा विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी आणि सेवेला मानवी स्पर्श देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत चालक आणि वाहक हे केवळ कर्मचारी न राहता 'सेवक' बनणार आहेत. बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन यांना आता केवळ नियमांची चौकट नसून, सेवाभावाची ओळख मानली जाणार आहे. बस सुटण्यापूर्वी चालकाने स्वतःची ओळख करून देत प्रवाशांना प्रवासाचा मार्ग, थांबे आणि अपेक्षित वेळ याची माहिती देणे—हा केवळ औपचारिक भाग नसून, प्रवाशांशी नातं जोडण्याचा एक सुसंवादी प्रयत्न असेल. प्रवासादरम्यान मदतीचा हात पुढे करणारा चालक-वाहक हा एसटीचा खरा चेहरा ठरेल. या अभियानात प्रवाशांनाही समान सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. स्वच्छता राखणे, मौल्यवान वस्तूंची जबाबदारी स्वतः घेणे, तसेच मोठे सामान योग्य ठिकाणी ठेवणे. या साध्या सवयी प्रवास अधिक सुखकर बनवतील.

## दूध भेसळ रोखण्यासाठी दिवसातून दोनवेळा दूध संकलनाची मोहीम

अहिल्यानगर (दै. संध्या) : राज्यात सर्वाधिक दूध उत्पादन करणारा जिल्हा म्हणून अहिल्यानगरची ओळख आहे. दूध भेसळ रोखण्यासाठी आणि दुधाची गुणवत्ता एकसमान टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात प्रशासनाने दोनवेळा दूध संकलन करण्यासाठी जनजागृती मोहीम सुरू केली आहे. काही तालुक्यातून अद्यापि एकवेळाच दूध संकलन होते आहे. दूध उत्पादक शेतकरी आणि दूध संकलन करणारे केंद्रचालकही खर्च वाचवण्यासाठी एकवेळा संकलन करतात. काही तालुक्यातून दोनवेळा दूध संकलन होत असले तरी काही तालुक्यात मात्र एकवेळाच दूध संकलन केले जात आहे. दूध व्यवसायातील जाणकारांच्या म्हणण्यानुसार एकदा दूध संकलन करून त्यास साठवून ठेवल्याने दुसऱ्या वेळीचे दूध, त्या शिळ्या दुधात मिळवून संकलन केल्यास त्याची अल्कोहोल चाचणी सकारात्मक येते.

**कार्यकारी अभियंता**
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था
प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, अण्णासाहेब मगर बिल्डींग,
पहिला मजला, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११०३७
ई-मेल mh-pun@nic.in
☎ 020-24260501

**निविदा सुचना क्रमांक ०१ / २०२६-२०२७ (द्वितीय मागणी)**

मा. जिल्हाधिकारी, यांनी निर्देश दिल्यानुसार पुणे जिल्ह्याकरीता मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेसाठी लागणाऱ्या यंत्र सामुग्री व पाईप पुरवठा दर तसेच कंत्राटदारांचे Empanelment निश्चित करणेस्तव कंत्राटदारांकडून विधानसभाक्षेत्र निहाय दोन वर्षासाठी ई-दरपत्रक मागविणेसाठी निविदा सूचना क्र. ०१ / २०२६-२७ www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७/०४/२०२६ सकाळी ११.०० पासून प्रसिध्द करणेत आलेली आहे.

सही/-
(स. स. नगरारे)
कार्यकारी अभियंता
प्रधानमंत्री ग्रामसडक योजना
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, पुणे

*क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C417*

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अनुसूचित जाती उपवर्गीकरण चळवळीला पिंपरी चिंचवडमधून निर्णायक उर्जा

पिंपरी (दैनिक संध्या) : सामाजिक न्यायाच्या दिशेने राज्यभर सुरू असलेल्या अनुसूचित जाती उपवर्गीकरण (अ, ब, क, ड) या अत्यंत संवेदनशील आणि ऐतिहासिक विषयाला पिंपरी चिंचवड शहरातून भक्कम जनाधार लाभताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर आज शहरात अनुसूचित जातीतील विविध समाजघटकांची एक व्यापक, अभ्यासपूर्ण आणि दिशा ठरवणारी बैठक पार पडली. या बैठकीस सुमारे 300 ते 350 प्रतिनिधी विविध समाजातून मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. ही उपस्थिती केवळ संख्येपुरती मर्यादित न राहता, सामाजिक प्रश्नांविषयीची जागरूकता, अस्मिता आणि न्यायाच्या लढ्याची जाणीव अधोरेखित करणारी ठरली. बैठकीत अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचा मुद्दा हा केवळ धोरणात्मक न राहता, तो सामाजिक समतेचा, हक्कांच्या न्याय्य पुनर्वाटपाचा आणि ऐतिहासिक अन्याय दुरुस्त करण्याचा मूलभूत प्रश्न असल्याचे ठामपणे मांडण्यात आले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरक्षणाचा लाभ पोहोचवायचा असेल, तर उपवर्गीकरण अपरिहार्य असल्याचा एकमुखी सूर उपस्थितांकडून उमटला. विशेषतः, चर्मकार समाज, वाल्मिकी समाज आणि मादीगा समाज या प्रमुख समाजघटकांनी अत्यंत ठाम, स्पष्ट आणि संघर्षशील भूमिका घेत या मागणीला पाठिंबा देत, पूर्ण ताकदीने लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. "आरक्षणातील समानता नव्हे, तर न्याय्य वाटप हा आमचा घटनात्मक अधिकार आहे," अशी ठाम भूमिका या बैठकीतून पुढे आली.

### संदीपभाऊ वाघेरे वैद्यकीय मदत कक्ष' सुरु; गरजू रुग्णांना मोफत उपचारांची संधी

पिंपरी (दैनिक संध्या) : गरीब व गरजू रुग्णांसाठी कार्यक्षम नगरसेवक संदीपभाऊ बाळकृष्ण वाघेरे यांच्या पुढाकारातून पिंपरी गावातील तपोवन मंदिर रोड येथील जनसंपर्क कार्यालयात "संदीपभाऊ वाघेरे वैद्यकीय मदत कक्ष" सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या रुग्णांना विविध आजारांवर मोफत मार्गदर्शन व शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध होणार आहे. या मदत कक्षामार्फत न्यूरो सर्जरी (मेंदू शस्त्रक्रिया), ऑर्थोपेडिक (हाडांच्या शस्त्रक्रिया), जनरल सर्जरी, हृदयरोग उपचार, किडनी विकार, कॅन्सर उपचार (केमोथेरपी, रेडिएशन), प्लास्टिक सर्जरी, बालरोग शस्त्रक्रिया, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, किडनी स्टोन ऑपरेशन, प्रोस्टेट सर्जरी तसेच अपघातग्रस्तांसाठी उपचार अशा विविध वैद्यकीय सेवांचा समावेश आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपर्यंत असणे आवश्यक असून केसरी/पिवळे रेशन कार्ड, आधार कार्ड, संबंधित हॉस्पिटलचे कोटेशन आणि फोटो सादर करणे आवश्यक आहे. या उपक्रमाबाबत बोलताना संदीप वाघेरे यांनी सांगितले की, "गरजू रुग्णांना वेळेत आणि योग्य उपचार मिळावेत, हा आमचा उद्देश आहे. या मदत कक्षाच्या माध्यमातून अनेकांना दिलासा मिळेल." अधिक माहितीसाठी अमित कुदळे (मो. ९६७३४९४१४९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी ही माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवून गरजू रुग्णांना या सुविधेचा लाभ मिळवून द्यावा, असेही सांगण्यात आले आहे.



### घरफोडी; महिलेला 24 तासांत अटक, 13 लाख 87 हजारांचा मुद्देमाल जप्त

पिंपरी (दैनिक संध्या) : महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी बनावट चावीचा वापर करून घरफोडी करणाऱ्या एका महिलेला अवघ्या २४ तासांत अटक करत कौतुकास्पद कामगिरी केली आहे. आरोपीकडून सुमारे १३ लाख ८७ हजार रुपये किमतीचे १० तोळे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या फिर्यादीनुसार, भरदिवसा घरफोडीची घटना घडली होती. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस उपआयुक्त श्वेता खेडकर व सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन कदम यांनी तत्काळ तपासाचे आदेश दिले. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. त्यामध्ये एका महिलेचा संशयास्पद वावर आढळून आला. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी सारिका संतोष भुजबळ हिला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपी महिला ही फिर्यादीच्या ओळखीची असल्याचे समोर आले. घरातील दागिन्यांची माहिती असल्याने तिने घराच्या दरवाजाची बनावट चावी तयार करून घेतली होती. संधी साधून घरात प्रवेश करून कपाटातील दागिने चोरल्याची कबुली तिने दिली. पोलिसांनी आरोपीकडून चोरीस गेलेले सर्व दागिने हस्तगत केले असून या प्रकरणाचा जलदगतीने छडा लावल्याबद्दल नागरिकांकडून पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे.

### पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कारभारात 'नियमावली केरात, कायदे बासनात'

पिंपरी (दैनिक संध्या) : 'माकडाच्या हातात कोलीत' अशी एक म्हणं मराठीत प्रचलित आहे, ती आपण सहजपणे वापरतो. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कारभारात तिचं भयावह वास्तव अक्षरश: डोळ्यासमोर ठाकलेलं दिसतंय. अयोग्य, अपात्र किंवा अगदीच बेजबाबदार हातात कारभार गेल्यास कायदे, नियम, सगळं काही कागदावरच राहते आणि उरते फक्त करदात्यांच्या पैशांची लूट आणि बेदरकार कारभार... गेल्या तीन महिन्यात पिंपरी पालिकेच्या कारभाराची ज्या पध्दतीने 'ऐसीतैशी' सुरू आहे, ते पाहता, आपण चुकून 'माकडाच्या हातात कोलीत' तर दिले नाही ना, असा प्रश्न सजग पिंपरी-चिंचवडकरांच्या मनात येतच असणार, याबद्दल कोणालाच शंका नसावी. पिंपरी पालिकेत प्रशासकीय कारभार असलेल्या चार वर्षांच्या काळात अब्जावधी रूपयांचे घोटाळे झाले. अधिकारी, ठेकेदार, राजकारणी अशा सगळ्यांनी मिळून संगनमताने पालिकेची तिजोरी लुटण्याचे काम केले. शहरविकासाचे दावे कागदावरच राहिले. नागरिकांची कामे झालीच नाहीत, हे कटू वास्तव पिंपरी-चिंचवडकरांनी उघड्या डोळ्यांनी अनुभवले. या दरोडेखोरीयुक्त प्रशासकीय कालखंडाचा आतापर्यंत शेकडो वेळा 'उध्दार'ही झाला. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींचा कारभार कधी सुरू होईल, याची सारे शहरवासीय चातकासारखी वाट पाहत होते.

# निगडी अमरधाम स्मशानभूमीत स्वच्छता व सुविधांबाबत दक्षता घ्यावी

## उपमहापौर शर्मिला बाबर यांचे निर्देश : नगरसेवक, नागरिक, अधिकाऱ्यांसमवेत पाहणी

निगडी (दै. संध्या)

निगडी येथील अमरधाम स्मशानभूमीच्या दुरवस्थेसंदर्भात निगडी, आकुर्डी, रुपीनगर, त्रिवेणीनगर परिसरातील नागरिकांच्या सतत येणाऱ्या तक्रारींबाबत, शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२६ रोजी संबंधित अधिकाऱ्यांसोबत पाहणी दौरा पार पडला. यावेळी अंतविधी व दशक्रिया विधी करताना भेडसावणाऱ्या विविध अडचणी सोडवून स्वच्छता, दुरुस्ती विषयक कामे करण्याचे निर्देश उपमहापौर शर्मिला बाबर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या



दौऱ्यात उपमहापौर शर्मिला बाबर यांच्यसह नगरसेवक प्रवीण भालेकर, कैलास कुटे, खंडोबा देवस्थानचे अध्यक्ष तानाजी काळभोर, नीलेश पांढरकर, पांडुरंग भालेकर, शंकर काळभोर, सोमनाथ काळभोर, सुशांत मोहिते, समीर काळभोर, संतोष काळभोर, दिलीप दातीर, विशाल केंदळे, आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. यावेळी निगडी स्मशान भूमीची दुरवस्था झाल्यामुळे मृत व्यक्तीच्या अंतविधी व दशक्रिया विधी करताना परिसरातील ग्रामस्थ व नागरिकांना विविध अडचणी निर्माण झाल्या आहेत. स्मशान भूमीत येताना रोडच्या कडेला टपऱ्या व हातगाड्यामुळे वाहतुक कोंडी होते. या टपरी व हातगाडीवाले यांना पर्याई जागा देऊन प्रथम रोड खुला करावा व फोर व्हिलर व टू व्हिलर साठी पार्किंग व्यवस्था करावी. सावडण्यावेळी मृत व्यक्तीची राख बाजूला घेतल्यावर पाण्याच्या पाईपने ती जागा स्वच्छ धूता यावी म्हणून या ठिकाणी नळ व पाईपची व्यवस्था करावी. स्वच्छ पाण्याची टाकी बांधून या टाकीला नळ कोढांळे बसवावे, तसेच पुरूष व महिला कपडे बदलण्यासाठी करण्यासाठी चेंजीग रूम बांधण्यात यावे, साहित्य ठेवण्यासाठी लोखंडी कपाटाची व्यवस्था करावी, अशा सूचना नागरिकांनी मांडल्या. या विविध बाबींवर चर्चा झाल्यानंतर फ क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी अतुल पाटील यांनी सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देत उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

> निगडी येथील अमरधाम स्मशानभूमीच्या दुरवस्थेसंदर्भात परिसरातील नागरिकांच्या तक्रारींनंतर अधिका-यांसह हा पाहणी दौरा करण्यात आला. प्रथमदर्शनी पाहता स्मशानभूमीमध्ये मुलभूत सुविधा सुद्धा उपलब्ध नसल्याचे दिसून आले. नागरिकांच्या सूचनांना प्राधान्य देत स्वच्छता व आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. हे निर्देश संबंधित अधिका-यांना दिले आहेत.
>
> **- शर्मिला बाबर, उपमहापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## पावसाळ्यापूर्वी हिंजवडीतील नालेसफाई, रस्ते दुरुस्तीला गती द्या!..!

हिंजवडी (दै. संध्या)

माहिती तंत्रज्ञान नगरी (आयटी हब) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडी आणि लगतच्या गावांमध्ये पावसाळ्यात उद्भवणारी वाहतूक कोंडी व पाणी साचण्याच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी दिले. हिंजवडी, माण आणि मारुंजी परिसरात पावसाळ्यापूर्व कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. स्थानिक आमदार शंकर मांडेकर आणि विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसह महानगर आयुक्तांनी शनिवारी (२५ एप्रिल) या भागाचा सविस्तर पाहणी दौरा केला. मुळशी तालुक्यातील हिंजवडी, माण, मारुंजी, भूगाव आणि पिरंगुट या पट्ट्यात पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था आणि अपूर्ण नालेसफाईमुळे नागरिकांना दरवर्षी मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर परिसरातील सर्व नैसर्गिक ओढे व नाले अतिक्रमणमुक्त करून त्यांच्या सफाईची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश महानगर आयुक्तांनी दिले. विशेषतः 'नांदे चौक' येथील पावसाळी जलवाहिन्यांचे (स्टॉर्म वॉटर ड्रेनेज) काम प्राधान्याने मार्गी लावण्यास त्यांनी सांगितले.

## रोजगार व कौशल्य विकासासाठी पिंपरी चिंचवडमध्ये महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका 'क' प्रभाग कार्यालय येथे फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन, लाईट हाऊस आणि दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील रोजगार विषयावर महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत शहरातील तरुण-तरुणींसाठी कौशल्य प्रशिक्षण, रोजगार निर्मिती आणि स्टार्टअप संधी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेसाठी उद्योजक, लाईट हाऊसचे विभाग प्रमुख तसेच तरुण-तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना आधुनिक काळात कंपन्यांमध्ये आवश्यक असणारे तांत्रिक प्रशिक्षण कसे उपलब्ध करून देता येईल, यावर



विशेष भर देण्यात आला. फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष श्री. अभय भोर यांनी उद्योगांना आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी विविध पर्याय मांडले तसेच शहरातील तरुणांना कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध करून देता येतील याबाबत मार्गदर्शन केले.

दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्षाच्या अध्यक्षा दुर्गा भोर यांनी शहरातील महिलांसाठी घरबसल्या रोजगार निर्मिती करण्यासाठी पुढील काळात कोणती पावले उचलावीत याबाबत आपले विचार मांडले. तसेच लाईट हाऊसच्या विविध प्रतिनिधींनीही तरुणांच्या रोजगाराच्या संधींबाबत आपले मत व्यक्त करत चर्चेत सहभाग घेतला.

या बैठकीस फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर .दुर्गा भोर (अध्यक्षा - दुर्गा ब्रिगेड राष्ट्रीय पक्ष), उद्योजक जसबिंदर सिंग, रेश्मा मुल्ला, जयश्री साळुंखे, उत्तमराव मांढरे तसेच लाईट हाऊस तर्फे पूजा मोगरे (क्लस्टर हेड - लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन), जय देवकर (प्लेसमेंट हेड - लाईटहाऊस कम्युनिटीज फाउंडेशन), संजय रामटेके (केंद्र प्रमुख - नेहरू नगर लाईटहाऊस) आदी मान्यवर उपस्थित होते. यासोबतच मोठ्या संख्येने उद्योजक प्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते.

## त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टीसाठी २८ एप्रिल रोजी भूमिपूजन

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मरणार्थ भव्य सृष्टी उभारण्यात येणार आहे. पिंपरी येथील भीमसृष्टी परिसरातील मोकळ्या जागेत ही सृष्टी साकारली जाणार असून या प्रकल्पाचे भूमिपूजन मंगळवार, २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय सामाजिक न्याय व अधिकारिता राज्यमंत्री रामदास आठवले, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तसेच राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. याशिवाय विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप यांची सन्माननीय उपस्थिती असणार आहे. तर आमदार उमा खापरे, अमित गोरखे, शंकर मांडेकर, महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याशिवाय प्रमुख अतिथी म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ.भीमराव आंबेडकर यांची देखील उपस्थिती असणार आहे.

यांच्यासह महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य अँड. गोरक्ष लोखंडे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी माई पठारे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर तसेच क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे तसेच नगरसदस्य सिद्धार्थ बनसोडे, राहुल भोसले, कुशाग्र कदम, तुषार हिंगे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, डॉ. वैशाली घोडेकर (लोंढे), सारिका मासुळकर, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे तसेच नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी हे देखील या कार्यक्रमास उपस्थित असणार आहेत.

पिंपरी चौक येथे नियोजित त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी २४ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. सुमारे २४९८.९७ चौरस मीटर क्षेत्रावर ही सृष्टी उभारली जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत सृष्टीला आकर्षक व दर्जेदार स्वरूप देण्यात येणार आहे. यासाठी मजबूत आरसीसी स्ट्रक्चर उभारले जाणार असून, म्युरल्ससाठी स्वतंत्र भिंती आणि आकर्षक जीआरसी काम करण्यात येणार आहे. माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी सुबक चौथरा व प्रतीक्षालय तसेच स्मारक परिसरात स्वतंत्र जिन्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

परिसराचे सौंदर्य वाढविण्यासाठी आकर्षक प्रवेश कमान, सुबक पादचारी मार्ग, लँडस्केप गार्डन आणि कारंज्यांची निर्मिती करण्यात येणार आहे. यासोबतच आधुनिक विद्युत रोषणाईद्वारे परिसर उजळविण्यात येणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, दिव्यांगांसाठी रॅम्प व लिफ्ट तसेच बसण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाणार आहे.

तंत्रज्ञानाचा वापर करत या सृष्टीमध्ये डिजिटल सुविधांचाही समावेश करण्यात येणार आहे. क्युआर कोडच्या माध्यमातून माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनकार्याची माहिती मिळेल, तर बहुभाषिक ऑडिओ प्रणालीद्वारे नागरिकांना अधिक समृद्ध अनुभव घेता येणार आहे.

> माता रमाई आंबेडकर यांच्या त्याग, संघर्ष आणि प्रेरणादायी जीवनकार्याची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी हे स्मारक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. करूणा सामाजिक समतेचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचविणारे हे स्मारक पिंपरी चिंचवड शहराच्या सांस्कृतिक ओळखीत मोलाची भर घालणार आहे.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## आपत्ती हाताळण्यासाठी नियंत्रण व नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

पिंपरी (दै. संध्या)

पावसाळ्यात संभाव्य नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवू शकणाऱ्या परिस्थितीत नागरिकांना तात्काळ मदत मिळण्यासाठी तसेच अशी परिस्थिती हाताळण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उप आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून तर अतिरिक्त आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने याबाबत आदेश जारी करण्यात आले आहेत.



नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि आपत्तीच्या वेळी तात्काळ प्रतिसाद मिळावा, यासाठी ही नियुक्ती करण्यात आली आहे. पावसामुळे शहरात गंभीर पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे रक्षण करणे आणि नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत मदत पोहोचविणे आवश्यक आहे. यासाठी क्षेत्रीय कार्यालय स्तरावर उपआयुक्त या पदावरील अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून व अतिरिक्त आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नोडल अधिकाऱ्यांनी पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाई यासारख्या कामकाजाची अंमलबजावणी विहित कालावधीत पूर्ण व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधावा. तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील पूरनियंत्रण आराखड्यानुसार आपत्ती व्यवस्थापन, स्थापत्य, पाणीपुरवठा, आरोग्य, अग्निशमन, वैद्यकीय व विद्युत विभागाशी समन्वय साधून पूरनियंत्रण व आपत्कालीन सेवा सुरळीतपणे पार पाडाव्यात, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# महापालिका व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्यावतीने प्रभात फेरीचे आयोजन

## संत तुकाराम नगर परिसरात नागरिकांमध्ये हिवताप प्रतिबंध व स्वच्छतेबाबत करण्यात आली जनजागृती




पिंपरी (दै. संध्या)

जागतिक हिवताप दिनानिमित्त आज पिंपरी चिंचवड महानगरपालिका पदव्युत्तर संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय (वायसीएम) यांच्या वतीने संत तुकाराम नगर तसेच रुग्णालय परिसरात हिवताप (मलेरिया) जनजागृतीसाठी प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रभात फेरीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये हिवताप प्रतिबंध, नियंत्रण आणि स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

प्रभात फेरीदरम्यान जागतिक आरोग्य संघटनेच्या यावर्षीच्या "हिवताप निर्मूलनासाठी कटिबद्ध – आता हे शक्य आहे, आता हे केलेच पाहिजे!" या घोषवाक्याचा प्रसार करण्यात आला. तसेच "कोरडा दिवस पाळा, हिवताप टाळा", "घराभोवती पाणी साठू देऊ नका", "मच्छरदाणीचा वापर करा" आणि "पूर्ण अंग झाकणारे कपडे परिधान करा" अशा घोषणा देत प्रतिबंधात्मक उपायांची माहिती नागरिकांना देण्यात आली. हिवताप हा डासांमुळे होणारा आजार असून योग्य काळजी आणि सातत्यपूर्ण जनजागृतीद्वारे त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते, असा संदेशही यावेळी देण्यात आला.

या प्रभात फेरीचे आयोजन पदव्युत्तर संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय प्रशासन, जनआरोग्य वैद्यकशास्त्र विभागाचे (कम्युनिटी मेडिसिन) प्राध्यापक व कनिष्ठ निवासी डॉक्टर, यशवंतराव चव्हाण स्मृती परिचर्या विज्ञान संस्था महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थी तसेच कुटुंब कल्याण विभागातील कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून करण्यात आले.

सदर कार्यक्रमास पदव्युत्तर संस्था व यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे तसेच जनआरोग्य वैद्यकशास्त्र विभागाचे प्राध्यापक तथा विभागप्रमुख डॉ. हर्षल पांडवे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहयोगी प्राध्यापक डॉ. मुकेश बावा, सहाय्यक प्राध्यापक सॅमसन लिओ यू, आरोग्य सहाय्यक माणिक चव्हाण, एमपीडब्ल्यू संतोष काशीद तसेच कनिष्ठ निवासी डॉक्टर उपस्थित होते.

यावेळी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत आरोग्याबाबत सतर्क राहण्याचे तसेच हिवतापाची लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले.

हिवताप (मलेरिया) हा मादी अॅनोफिलीस डासाच्या चाव्याने पसरणारा आजार आहे. याची लक्षणे जरी सामान्य वाटत असली तरी दुर्लक्ष केल्यास गंभीर ठरू शकतात.

### हिवतापाची लक्षणे

* सतत किंवा अधूनमधून येणारा ताप
* थंडी वाजणे आणि अंगावर शहारे येणे
* डोकेदुखी आणि अंगदुखी
* मळमळ किंवा उलट्या
* अशक्तपणा व थकवा जाणवणे
* अचानक घाम येणे

### उपाययोजना कराव्यात

* घराभोवती किंवा परिसरात पाणी साचू देऊ नका
* आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळा
* मच्छरदाणीचा नियमित वापर करा
* पूर्ण अंग झाकणारे कपडे परिधान करा
* खिडक्या-दरवाज्यांना जाळ्या लावा
* डास प्रतिबंधक क्रीम/औषधांचा वापर करा
* परिसर स्वच्छ ठेवा आणि कचरा साचू देऊ नका

## थोडक्यात पण महत्वाचे...

### प्रसिद्ध सनईवादक हरीभाऊ पवार यांचे निधन; सांगीतिक क्षेत्रावर शोककळा



कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील सविंदणे येथील सुप्रसिद्ध सनईवादक हरीभाऊ पवार (वय ७५) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या जाण्याने सांगीतिक क्षेत्रावर शोककळा पसरली असून शिरूर तालुक्याने एक गुणी आणि समर्पित सनई वादक कलावंत गमावला आहे. हरीभाऊ पवार हे सनई वादनातील मान्यवर नाव म्हणून ओळखले जात होते. 'हरि-नाथा' या नावाने त्यांच्या ताफ्याची ख्याती महाराष्ट्रभर पसरली होती. त्यांच्या सनईच्या सुरांनी असंख्य विवाह सोहळे, धार्मिक कार्यक्रम आणि सांस्कृतिक समारंभांना एक वेगळी उंची मिळाली होती.पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे या ठिकाणी त्यांच्या ताफ्याला मोठी मागणी होती. कोणतेही लग्नकार्य, यात्रा किंवा धार्मिक उत्सव त्यांच्या सनईशिवाय अपूर्ण वाटत असे. त्यांच्या वादनातील माधुर्य, शिस्त आणि पारंपरिकता ची जपणूक यामुळे त्यांनी रसिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले होते.साधी राहणी आणि उच्च कलात्मकता ही त्यांची ओळख होती. आपल्या सुरेल सनईच्या तालावर त्यांनी अनेकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या निधनामुळे कुटुंबीयांसह संपूर्ण संगीतप्रेमी समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. विविध स्तरांतून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात येत असून "सनईचा एक सुरेल आवाज कायमचा थांबला" अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत.

### टाकळी हाजी येथे घोड नदीवरील बंधाऱ्याचे कठडे तुटले : मोठी दुर्घटना घडण्याची भीती

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी येथील घोडनदीवरील के.टी.बंधाऱ्यावर बसविण्यात आलेले लोखंडी कठड्यांचे पाइप तुटल्यामुळे वाहनचालकांसाठी गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या बंधाऱ्यावरून दररोज दुचाकी, चारचाकी तसेच शेतीकामासाठी वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र, सुरक्षिततेसाठी असलेले कठडेच तुटल्याने पुलाच्या कडेला आता कोणताही आधार उरलेला नाही. यामुळे एखादे वाहन थेट नदीपात्रात कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात या पुलावरून प्रवास करणे अधिकच जिकिरीचे ठरत आहे. स्थानिक नागरिकांनी आणि ग्रामस्थांनी याबाबत अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत, परंतु अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. शालेय विद्यार्थी, महिला आणि शेतकऱ्यांचा या मार्गावर मोठा वावर असल्याने प्रशासनाच्या या दिरंगाईबद्दल तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या गंभीर परिस्थितीवर बोलताना चेअरमन शिवाजी घोडे यांनी प्रशासनावर कडक शब्दात ताशेरे ओढले आहेत एखादी जीवितहानी झाल्यानंतरच यंत्रणेला जाग येणार का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला असून तातडीने कठड्यांची दुरुस्ती करण्याची मागणी घोडे यांनी केली आहे. प्रशासनाने या प्रकरणाची त्वरित दखल घेऊन सुरक्षितता उपाययोजना हाती न घेतल्यास ग्रामस्थांकडून आंदोलनाचा पवित्रा घेतला जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### आई वडील आणि संत हेच आपले गुरु - गीतांजली झेंडे



चाकण (दैनिक संध्या) : जन्मदाते आई वडील आणि संत हेच आपले गुरु असून, त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल केली पाहिजे, असे विचार समाजप्रबोधनकार हभप. गीतांजली झेंडे यांनी येथे व्यक्त केले. खेड तालुक्यातील मेदनकरवाडी, बालाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात मार्गदर्शन करताना झेंडे बोलत होत्या. उद्योजक बप्पासाहेब जोगदंड व युवक नेते अरुण कुसाळकर यांच्या संकल्पनेतून मेदनकरवाडी येथे हा सोहळा सुरू आहे. नित्याचा काकडा आरती, विष्णु सहस्रनाम, श्री ज्ञानेश्वरी पारायण, भजन, हरिपाठ व हरिजागराचा कार्यक्रमही सुरू आहे. याप्रसंगी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे प्रदेश संपर्कप्रमुख हभप. विनोद महाळुंगकर, उद्योजक बप्पासाहेब जोगदंड, मुक्ताजी नाणेकर, अमृत शेवकरी, राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक सचिन मांजरे, उद्योजक निलेश जेधे, दिलीप इंगवले, मयूर मुटके, रामदास कुसाळकर आदी उपस्थित होते. अध्यात्मा शिवाय पर्याय नाही असे सांगून, गीतांजली झेंडे पुढे म्हणाल्या," संत हेच समाज घडवतात. त्यांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. संतांचा आदर्श घ्या." पारायणाला बसलेल्या वाचकांना यावेळी ज्ञानेश्वरी प्रत मोफत देण्यात आली.



### मॉडर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मुक्या जीवांची भागवली तहान

नारायणगाव (दैनिक संध्या) : बेल्हे (ता. जुन्नर ) येथील मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या इको क्लबच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शालेय परिसरातील 50 ते 60 झाडांवर कंपाउंड भिंतीवर, गार्डनमध्ये छतावर पक्ष्यांसाठी पाण्याची सोय केली आहे. पाण्यासाठी घरातील रिकामे डबडे, प्लास्टिकची भांडी,पाण्याच्या टाकाऊ बाटल्यांचा वापर करून त्यात पाणी ठेवले आहे. प्रत्येक दोन दिवसानंतर त्या भांड्यांमधील पाणी तपासून परत ठेवण्यासाठी काही विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमानंतर काही वेळाने पक्षी भिंतीवरील भांड्यांमध्ये पाणी पिताना दिसली. व या पक्षांसाठी एवढेच तर नक्की करू शकतो याची विद्यार्थ्यांना जाणीव झाली. तालुक्यात सध्या प्रचंड तापमान वाढले असून 41 अंशाच्या वर पारा चढला आहे. उन्हाळ्यात पाण्याच्या आणि अन्नाच्या शोधात पक्षी अनेक ठिकाणी भटकंती करत असतात. कडक उन्हाळ्यात काही पक्षी पाण्याअभावी मरतात. त्यामुळे पशुसंवर्धनासाठी हा उपक्रम हाती घेतला. शालेय परिसरामध्ये अनेक कबूतर, चिमणी,कावळा, पारवा यासारखे पक्षी विद्यालयात येतात. पक्षी व प्राण्यांबाबत प्रेम, अस्मिता जपणे काळाची गरज असल्याचे यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितले. पशु वाचवा,प्राणी वाचवा अशा घोषणा दिल्या. यावेळी शाळेच्या प्राचार्या विद्या गाडगे यांनी या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. व घरी आपल्या घराजवळील परिसरात अशाच प्रकारे पशुपक्ष्यांसाठी खाद्य ठेवण्यास सांगितले. यावेळी विश्वस्त दावला कणसे,प्राचार्या विद्या गाडगे,उपप्राचार्य के. पी. सिंग, शाळेचे शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सदर विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक सीए सावकार गुंजाळ,अध्यक्ष गोपीनाथ शिंदे,सीइओ शैलेश ढवळे, व सर्व संचालक मंडळ, पालकांनी कौतुक केले.

# चाकण बाजारात पालेभाज्यांची भरपूर आवक



**चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये हिरवी मिरची, गाजर, कांदा, लसूण व दोडक्याची भरपूर आवक झाली. फळभाज्यांसह पालेभाज्यांची उच्चांकी आवक होऊनही भाव तेजीत राहिले. एकूण उलाढाल ५ कोटी ९० लाख रुपये झाली. चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ४ हजार २५० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ५०० ते १,००० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. बटाट्याचा कमाल भाव १,३०० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक ३० क्विंटल झाली. लसणाला १० हजार रुपये कमाल भाव मिळाला.

हिरव्या मिरचीची एकूण आवक ३५८ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे - कांदा - एकूण आवक - ४,२५० क्विंटल. भाव क्रमांक - १.१,००० रुपये, भाव क्रमांक २.८०० रुपये, भाव क्रमांक ३. ५००., बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल. भाव क्रमांक १.१,३०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३.५०० रुपये.

फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३१६ क्विंटल (१,००० ते १,८०० रू.), कोबी - २२० क्विंटल (४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - १९५ क्विंटल (६०० ते १,००० रु.), वांगी - ८९ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), भेंडी - ८६ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), दोडका - ५८ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), कारली - ६८ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ४८ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ९५ क्विंटल (१,००० ते १,६०० रु.), फरशी - २६ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), वालवड - ४० क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), ढोबळी मिरची - १४४ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), चवळी - ४४ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), वाटाणा - २० क्विंटल (८,००० ते १०,००० रू. ), शेवगा - ४८ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गाजर - १०० क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), गवार - ५० क्विंटल (२,००० ते ३,००० रु. ), आले - १५० क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु. ), ओली भुईमूग शेंग - ३५ पोती (३,५०० ते ४,५०० रूपये,...

## तहसीलदार ठार तर दोन जखमी

**जुन्नर (दै. संध्या)**

बनकर फाटा जुन्नर मार्गावर गणपती फाट्याच्या पुढील एस कॉर्नरवर हायवाची व कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात जुन्नरचे निवडणूक नायब तहसीलदार गंभीर जखमी होऊन ठार झाले असून दोन महसुलाचे कर्मचारी जखमी झाले आहेत. सदर अपघात शनिवारी दुपारी २.३० वाजे दरम्यान बनकरफाटा जुन्नर मार्गावर पांगरीमाथ्याच्या मागे एस कॉर्नरवर झाला असून यात निवडणूक नायब तहसीलदार अनंथा बनाजी गवारी वय ५२ हे गंभीर जखमी होऊन ठार झाले आहेत.तर विजय खार्तोडे वय.४८ हे दोघे गंभीर जखमी झाले असून तुषार भीमराव कोरडे वय ३५ (सर्व रा.जुन्नर ता.जुन्नर जि.पुणे)हे किरकोळ जखमी झाले आहेत. याबाबत स्थानिकांकडून मिळालेली माहिती अशी महसुल अधिकारी होंडा सिटी कार बनकरफाट्या कडुन जुन्नरच्या दिशेने जात होती त्याच वेळी पांगरीमाथ्या कडुन बनकरफाट्याच्या दिशेने हायवा येत होता.एस कॉर्नर वर होंडा सिटी कारची व हायवाची समोरासमोर धडक होऊन कारमधील गवारी व खर्तोडे गंभीर जखमी झाले. ही धडक इतकी भिषण होती की कार जी जुन्नरकडे चालली होती तीचे फिरून परत बनकरफाटा बाजूला तोंड झाले होते. या अपघाताची माहिती मिळताच ओतूरचे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी किशोर बर्डे व इतरांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन स्थानिक नागरीकांच्या मदतीने जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठवले. तसेच अपघातग्रस्त वाहने मार्गावर बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

## आमदाबाद येथे दोन विद्युत रोहित्र फोडून तांब्याची चोरी

**कवठे येमाई (दै. संध्या)**

**महावितरणचे मोठे नुकसान**

शिरूर तालुक्यातील आमदाबाद हद्दीतील माशेरेमळा परिसरात चोरट्यांनी धाडसी चोरी करत दोन विद्युत रोहित्र (ट्रान्सफार्मर) फोडून त्यातील सुमारे १२० किलो तांब्याच्या तारांची चोरी केल्याची घटना मंगळवारी (दि. २१) उघडकीस आली. या प्रकारामुळे महावितरणचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात भीती व संतापाचे वातावरण पसरले आहे.

याप्रकरणी महावितरणचे वरिष्ठ तंत्रज्ञ उत्तम गाडेकर (रा. शिरूर) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. चोरट्यांनी झंझाड-थोरात व रामा पावसे येथील रोहित्रे नियोजनपूर्वक फोडून त्यातील तांब्याच्या तारांवर डल्ला मारला. तसेच रोहित्रातील ऑईल सांडून अतिरिक्त नुकसान केल्याचेही समोर आले आहे.



घटनेनंतर ग्रामस्थांनी संताप व्यक्त करत, "चोरट्यांचा धाडसाचा कळस झाला आहे," अशी प्रतिक्रिया दिली. वारंवार होणाऱ्या चोरीमुळे स्थानिक सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान,काही दिवसांपूर्वी कृषी पंप चोरी प्रकरणात पोलिसांनी काही आरोपींना अटक केल्याचा दावा केला होता. मात्र मुख्य आरोपी अद्याप फरार असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.शिरूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कृषी साहित्य, पंप, केबल, रोहित्र, पशुधन चोरी तसेच चेन स्नॅचिंगसारख्या गुन्ह्यांत वाढ होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. चोरी प्रकरणातील आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## मेडिकल प्रॅक्टिशनर्स असो.च्या अध्यक्षपदी डॉ. प्रतिक गायकवाड यांची निवड

**नारायणगाव (दै. संध्या)**

आंबेगाव तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने कार्यकारणीचा पदग्रहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. नव्या कार्यकारणीच्या अध्यक्षपदी डॉ. प्रतिक गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे .तर उपाध्यक्षपदी डॉ. पूनम दहितुले यांची निवड करण्यात आली आहे.

पदग्रहण सोहळ्याच्या अध्यक्षपदी डॉ. पंजाबराव कथे,डॉ. स्वप्नील चौधरी, डॉ. अमोल बेनके, डॉ. अमृत पेरणे, डॉ. पवन वैरागर, डॉ. प्रशांत काचळे, डॉ. पौर्णिमा कहाणे ,डॉ सुनील खिंवसरा ,डॉ. सुहास कहडणे, डॉ. वर्षाराणी गाडे उपस्थित राहणार आहेत.



डॉ.प्रतिक गायकवाड यांचे मंचर येथे विघ्नहर्ता नावाने गेली 10 वर्ष हॉस्पिटल कार्यरत आहे. या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले. समाज प्रबोधन ,रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण याद्वारे अनेकांना त्याचा लाभ झाला आहे. याशिवाय प्रत्येक वर्षी आळंदी ,पंढरपूर वारी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय शिबीर आयोजित करून वारकऱ्यांची सेवा केली आहे .भिमाशंकर मेडिकल कॉलेज मंचर येथे असो. प्रोफेसर विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

आजोबा वैकूंटवासी ह .भ .प निवृत्ती महाराज गायकवाड व वडील प्राचार्य डॉ. पांडुरंग गायकवाड यांचा वारकरी संप्रदायाचा व समाजसेवेचा समृद्ध वारसा लाभला आहे. तो अखंडित पुढे चालवण्याचा मानस आहे. त्यांच्या निवडीबद्दल महाराष्ट्र राज्याचे नामदार मंत्री महोदय दिलीपरावजी वळसे पाटील, जि. प. उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, मंचर शहरचे नवनिर्वाचित नगरसेवक शिवाजी राजगुरू, लोकशाहीर साहित्यरत्न समाजभूषण महाराष्ट्र शासन पुरस्कार्थी काशिनाथ आल्हाट,सेवानिवृत्त वनाधिकारी वसंतराव लोंढे यांनी अभिनंदन केले आहे.

## पाटसच्या शेतकऱ्याला एकरी ४ ते ५ लाखांचे उत्पन्न

**कानगाव (दै. संध्या)**

पारंपरिक शेतीला पर्याय शोधत पाटस (ता. दौंड) येथील प्रगतशील शेतकरी औदुंबर अरुणराव भागवत यांनी मुरमाड माळरानावर केलेला 'नीरा' लागवडीचा प्रयोग पुणे जिल्ह्यात लक्षवेधी ठरत आहे. तीन एकर क्षेत्रात सिंधी उर्फ ताडीच्या झाडांची लागवड करून त्यांनी शेतीत नवा आदर्श निर्माण केला असून या प्रयोगातून त्यांना दरवर्षी एकरी ४ ते ५ लाख रुपये उत्पन्न मिळत आहे. भागवत यांनी सन २०१६ मध्ये डहाणू येथून दर्जेदार सिंधीची रोपे आणून १० बाय १० अंतरावर लागवड केली. ठिबक सिंचनाचा वापर करून झाडांची संगोपन केले. या झाडांना उत्पादनक्षम होण्यासाठी सहा ते सात वर्षांचा कालावधी लागतो. या कालावधीत त्यांनी आंतरपिके घेत उत्पन्नाचा स्रोत कायम ठेवला. सात वर्षांनंतर झाडांची पूर्ण वाढ झाल्यावर नीराचे उत्पादन सुरू झाले.

## गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पोलीस दल सज्ज : संदिपसिंग गिल्ल

**शिरूर (दै. संध्या)**

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पोलीस दल सज्ज असून जनतेच्या तक्रारींची दखल घेऊन गुन्हेगारी व अवैध धंद्यांवर कठोर कारवाई केली जाईल. नशामुक्ती मोहिम सातत्याने राबवली जाईल असे पोलीस अधिक्षक संदिपसिंग गिल यांनी स्पष्ट केले. शिरूर तालुक्यात वाढत चाललेले अवैध धंदे, गावठी दारू,अमली पदार्थ व वाढती गुन्हेगारी याविरोधात विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज यांनी ९ दिवसांपासून सुरू केलेल्या सत्याग्रह आंदोलन स्थगित करण्यात आले असून यश मिळाले आहे. जिल्हा पोलीस अधिक्षक संदिपसिंग गिल यांनी गुरुवार दि.२३ रोजी



उशिरा सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळूंज यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली या आंदोलनाची शासन व प्रशासन स्तरावर वरिष्ठ स्तरावर गांभीर्याने दखल घेत जिल्हा पोलिस प्रशासनाने गुन्हेगारी मोडीत काढण्याचे व नशामुक्तीसाठी तसेच कायद्याचा धाक प्रभावीपणे प्रस्थापित करण्याचे आश्वासन यावेळी दिले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले,पोलिस निरीक्षक संदेश केंजळे,घोडनदी वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.उदय सरोदे,ॲड.अभिषेक बाफना,किरण कुरंदळे,ज्ञानेश्वर कुरंदळे आदी उपस्थित होते.

## जेजुरीच्या माजी नगराध्यक्षा अमृता संदिप घोणे यांना पीएचडी

**जेजुरी (दै. संध्या)**

जेजुरी नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ.अमृता संदिप घोणे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य शाखेमार्फत "बँकिंग आणि वित्त" या अभ्यास मंडळातून विद्यावाचस्पती (Ph.D.) ही पदवी संपादन केली आहे. "पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची वित्तीय कामगिरी आणि समस्यांचा चिकित्सक अभ्यास" या विषयावर त्यांनी आपले संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

हे संशोधन एम.एम.सी.सी. कॉलेजचे प्राचार्य डॉ. किशोर निकम यांच्या मार्गदर्शनाखाली, व डॉ.डि.वाय.पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे या संशोधन केंद्रातून पूर्ण करण्यात आले. ह्या संशोधन कार्यादरम्यान त्यांनी आपल्या विषयाशी संबंधित एकूण ९ संशोधन पत्रे आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्तरावर सादर करून प्रसिद्ध केली आहेत. सौ. अमृता घोणे या जेजुरीच्या माजी नगराध्यक्षा असून,महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्री खंडोबा देवस्थान वर विश्वस्त म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे.सध्या त्या राष्ट्रवादी



काँग्रेस पक्षाच्या (अजित दादा) प्रदेश संघटक सचिव म्हणून राज्य कार्यकारणीवर कार्यरत आहेत. तसेच कोल्हापूर जिल्ह्याच्या पक्ष निरीक्षक म्हणूनही त्या कार्यरत आहेत.आपल्या उत्कृष्ट वकृत्व शैलीसाठी सुद्धा त्या राज्यभर विशेष ओळखल्या जातात.

राजकीय,सामाजिक क्षेत्रातील जबाबदाऱ्या प्रभावीपणे सांभाळत असतानाही त्यांनी शिक्षणाची ओढ जपली. लग्नाआधी फार्मासिस्ट असणाऱ्या सौ. घोणे यांनी लग्नानंतर बी.कॉम. व नंतर एम.कॉम. पदवी घेतली , पहिल्याच प्रयत्नात SET परीक्षा उत्तीर्ण, जीडीसी अँड ए परीक्षा उत्तीर्ण ,सज्जनगड देव संस्थानची दासबोध ग्रंथावर आधारित परिचय,प्रबोध व पारंगत ही पदवी आणि आता विद्यावाचस्पती (पीएच.डी).ही पदवी संपादन करून उल्लेखनीय शैक्षणिक यश मिळवले आहे.

## श्री केदारेश्वर विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानात अभिमानास्पद कामगिरी

**काळदरी (दै. संध्या)**

पुणे जिल्हा परिषद, माध्यमिक शिक्षण विभाग आणि पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान २०२५-२६ (टप्पा २) मध्ये श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज काळदरी या विद्यालयाने ५ वी ते १२ वीच्या शाळा असलेल्या अ गटात पुरंदर तालुक्यात अभिमानास्पद कामगिरी करीत प्रथम क्रमांक पटकावला.



शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी राबविण्यात आलेल्या या अभियानात संपूर्ण पुणे जिल्ह्यातून १६२० शाळांनी सहभाग नोंदविला होता. तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय परीक्षकांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, अध्यापन पद्धती, उपक्रमांची अंमलबजावणी, सहशालेय उपक्रम, शालेय परिसर, स्वच्छता व सुशोभीकरण आदी निकषांवर आधारित मुल्यांकन केले. विद्यालयाचा परीसर, बगिचा, इ-लर्निंग सुविधा, भव्य आखीव रेखीव क्रिडांगण, सुसज्ज ग्रंथालय, अत्याधुनिक प्रयोगशाळा, संगणक कक्ष, विद्यार्थी शिस्त, शालेय अभिलेखे इ बाबींची पाहणी करून त्यांनी सर्वांचे कौतुक केले. प्राचार्य विजय चिकणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी आणि काळदरी ग्रामस्थ यांच्या सहकार्यातून काळदरी विद्यालयाने तालुक्यात सर्वाधिक गुण मिळवून अव्वल स्थान कायम राखले.

पुणे येथील गणेश कला क्रीडा रंगमंच येथे पार पडलेल्या पारितोषिक वितरण समारंभात शिक्षणाधिकारी डॉ भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. यावेळी राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर, पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक डॉ गणपत मोरे, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, सचिव शिवाजी कामथे, कार्याध्यक्ष राजेश गायकवाड, उपाध्यक्ष सुधाकर जगदाळे आदी उपस्थित होते. विद्यालयाचे प्राध्यापक संतोष नवले व सहशिक्षिका सौ सुनंदा टकले यांनी या पारितोषिकाचा मान्यवरांच्या उपस्थितीत स्विकार केला.

विद्यालयाच्या या अभिमानास्पद कामगिरीबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, सचिव मा आमदार संजय जगताप, संस्थेचे मार्गदर्शक तथा सनदी अधिकारी बापूसाहेब जगताप, संस्थापक-सचिव डॉ एम एस जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी साहेब, व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे, सहव्यवस्थापक रविंद्रपंत जगताप यांनी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

## वाचकांचे मनोगत...




मुंबई महानगरपालिका क्रीडा भवन ( म्युनिसिपल जिमखाना) स्थापना ब्रिटिश काळात तत्कालीन महापालिका आयुक्तांनी २६ एप्रिल १९२६ रोजी केली. या घटनेला आज १०० वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्यपूर्व काळातील इंग्रज अधिकाऱ्यांनी खेळाचे महत्त्व ओळखून त्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना खेळाची सुविधा उपलब्ध करून दिली.प्रथम जिमखान्याची घटना तयार केली. त्या घटनेच्या नियमावली व नियम नुसार पुढील शंभर वर्षांत लावलेल्या रोपट्याचा कल्पवृक्ष झाला.आझाद मैदान शेजारी क्रीडा भवन बहुमजली इमारत झाली.टेबल टेनिस कोर्ट, बॅडमिंटन कोर्ट, व्यायाम शाळा, बुद्धीबळ,ब्रिज,कॅरम हॉल, कार्यालय, उपहारगृह,दोन कामगारांकरिता निवास स्थाने,इमारतीवर मोठे जाहिरात होर्डिंग्ज इमारतीत आहेत.१९७२ साली दादर शिवाजी पार्क येथे क्रीडा भवनची इमारत बांधण्यात आली, दुसरी शाखा निर्माण झाली.तेथे टेनिस टेनिस कोर्ट, बॅडमिंटन कोर्ट, लॉन टेनिस कोर्ट, व्यायाम शाळा,ब्रिज,कॅरम हॉल , विवाह सोहळ्याच्या करिता वधु - वर स्वतंत्र खोल्या.विवाह सोहळ्याकरिता मोकळी जागा.शिवाजी पार्क मैदानात क्रिकेटची खेळ पट्टी, कबड्डी खेळ सरावासाठी मैदान, जाहिरात मोठे होर्डिंग्ज होते. शिवाजी पार्क क्रीडा भवनाच्या जागेवर शासनाने 'महापौर बंगला ' बांधण्यासाठी क्रीडा भवनची जागा ताब्यात घेऊन जागेचे विकास आराखड्यात जागेचे निवासी आरक्षण केले.२०२३ साली प्रशासनाने क्रीडा भवन इमारतीची पर्यायी इमारत बांधुन देण्याचे आश्वासन दिले होते.आजतागायत पर्यायी व्यवस्था झाली नाही.क्रीडा भवन विविध खेळ खेळते.त्यात कबड्डी - पुरुष व महिला संघ,कॅरम - पुरुष व महिला संघ, टेनिस टेनिस- पुरुष व महिला संघ, बॅडमिंटन - पुरुष व महिला संघ, पॉवर लिफ्टींग - पुरुष व महिला संघ, वेटलिफ्टींग- पुरुष व महिला संघ, बुद्धीबळ - पुरुष व महिला संघ, फुटबॉल संघ,खो- खो संघ, शुटींग बॉल संघ, व्हॉलीबॉल संघ, नेमबाजी, गिर्यारोहण, शरीरसौष्ठव, क्रिकेट संघ, अॅथलेटीक्स इत्यादी खेळांचा समावेश आहे.क्रीडा भवन संलग्न क्रीडा केंद्रे ३१ आहेत.विविध महानगरपालिका यानगृहे, रुग्णालये, सहाय्यक आयुक्त विभाग कार्यालये, मुद्रणालय,लॉन्ड्री, रुग्णवाहिका गॅरेज इत्यादी ठिकाणी कार्यरत आहेत.क्रीडा भवन प्रती वर्षी वार्षिक क्रीडा स्पर्धा, वार्षिक सर्वसाधारण सभा, वार्षिक आर्थिक ताळेबंद,लेखा परीक्षण करण्यात येते.दर दोन वर्षांनी खेळाडूंमधुन कार्यकारिणी समिती निवडण्यासाठी सभासदांची निवडणूक घेण्याची घटनेत तरतूद असल्याने मुंबई महानगरपालिका निवडणूक विभाग निवडणूक कार्यक्रम जाहीर करून निवडणूकीत प्रथम अकरा उमेदवार सर्वाधिक मते घेऊन निवडून येतात त्यांची कार्यकारिणी समिती तयार केली जाते. अधिक सहा सदस्य नामनिर्देशित घेण्याची नियमात तरतूद आहे.मुंबई महानगरपालिका आयुक्त हे क्रीडा भवन कार्यकारिणी समितीचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत,दोन महापालिका उप आयुक्त क्रीडा भवन कार्यकारिणी समितीचे उपाध्यक्ष आहेत.क्रीडा भवनाचे सर्वसाधारण सभासद दहा हजार तर, आजीव सभासद अडीच हजार ( यात नगरसेवकांचा समावेश आहे) घटनेत नगरसेवकांना सभासद करण्याची तरतूद आहे.मासिक वर्गणी सभासदांच्या वेतनातून घेतली जाते.महापालिकेत एक वर्ष पूर्ण झालेला कर्मचारी क्रीडा भवनचा सभासद होता येते.क्रीडा भवन खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर मुंबई महानगरपालिकेचे नाव उज्ज्वल केले आहे.देशपातळीवर अर्जुन पुरस्कार, छत्रपती पुरस्कार, दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त केले आहेत.क्रीडा भवन दरवर्षी डी डी दारूवाला क्रिकेट स्पर्धा,विजय फाटक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा खात्यांतर्गत घेते.उत्तम दर्जाच्या खेळाडूंना महापालिका क्रीडा भवन क्रिकेट संघात समावेश होतो.क्रिकेट खेळाडू संजय पाटील यांची रणजी क्रिकेट निवड झाली होती.क्रीडा भवनाच्या विविध संघांनी अंतिम विजेता पदके जिंकली आहेत. क्रीडा भवनाच्या सर्व खेळाडू, सभासद , आजीव सभासद यांना माझा मानाचा मुजरा, क्रीडा भवन शताब्दी वर्ष आहे.परंतु आज साप्ताहिक सुट्टी असल्याने उद्या, सोमवार, दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी श्री सत्यनारायण महापूजेने शताब्दी महोत्सव प्रारंभ करण्यात येणार आहे.

**- महादेव गोळवसकर मुंबई, ९८६९४७६२०९**
**mahadeo golvaskar @gmail.com**

## थोडक्यात पण महत्वाचे...

IDFC FIRST Bank

### आयडीएफसी फर्स्ट बँकेचा तिमाहीतील पीएटी रु. 319 कोटी असून त्यात 5% वाढ

■ अपवादात्मक घटनेचा परिणाम वगळून सामान्यीकृत पीएटी रु 746 कोटी इतका असून, वर्षानुवर्ष 145% वाढ दर्शवितो.

मुंबई (दैनिक संध्या) : आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत 31 मार्च 2026 रोजी संपलेल्या तिमाही आणि संपूर्ण आर्थिक वर्षासाठीचे ऑडिट केलेले आर्थिक निकाल मंजूर केले आहेत. निकालांवर भाष्य करताना, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. व्ही. वैद्यनाथन म्हणाले, “बँकेची मालमत्ता गुणवत्ता स्थिर राहिली आहे. आम्ही नेहमीच नमूद केले आहे की मायक्रो-फायनान्स पोर्टफोलिओ वगळता सर्व व्यवसायांची मालमत्ता गुणवत्ता चांगली कामगिरी करत आहे, कारण आर्थिक वर्ष 25 आणि आर्थिक वर्ष 26 दरम्यान हा मुद्दा संपूर्ण उद्योगासाठी होता. त्यामुळे मायक्रो-फायनान्सचा प्रश्न मागे पडल्याने जीएनपीए आणि एनएनपीए अनुक्रमे 1.61% आणि 0.48% या आरोग्यदायी स्तरावर आले आहेत. आर्थिक वर्ष 26 च्या चौथ्या तिमाही दरम्यान तरतुदी मागील दोन वर्षांतील सर्वात कमी स्तरावर 1.63% (कर्जांवर) झाले असून, ते मालमत्तेच्या 1.18% इतके आहे. आर्थिक वर्ष 27 च्या पहिल्या तिमाही चा पहिला महिना ठेवींसाठी मजबूत सुरुवात दर्शवतो, आणि बँक मागील प्रवृत्तीनुसार ठेवींच्या व्यवसायात निरोगी वाढ होण्याबाबत आत्मविश्वास बाळगते.”

### ST प्रवाशांसाठी मोठे पाऊल; 1 मे पासून ‘लालपरी’चे नवे अभियान होणार सुरु

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्राच्या जनजीवनाशी नाळ जोडलेली लालपरी आता नव्या उमेदीनं, नव्या शिस्तीने आणि नव्या संवेदनशीलतेने प्रवासाला सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने “आपली बस आपली सेवा” या व्यापक अभियानाच्या माध्यमातून प्रवासी सेवेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे. मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासीसंख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नसल्याची जाणीव महामंडळाने गांभीर्याने घेतली आहे. याच जाणिवेतून प्रवाशांचा विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी आणि सेवेला मानवी स्पर्श देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत चालक आणि वाहक हे केवळ कर्मचारी न राहता ‘सेवक’ बनणार आहेत. बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन यांना आता केवळ नियमांची चौकट नसून, सेवाभावाची ओळख मानली जाणार आहे.

# राजेश खर्डे वेसावकर यांना अवधूत गुप्ते यांच्या हस्ते पुरस्कार

**भिवंडी (दै. संध्या)**



शिवप्रेमी सामाजिक संस्था, लोणारे अलिबाग यांच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध गायक रोहित पाटील व सुप्रसिद्ध पार्श्वगायक संगीतकार अवधूत गुप्ते यांच्या शुभहस्ते, कोळी नटसम्राट राजेश खर्डे वेसावकर यांना अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृहामध्ये "शिवरत्न भूषण पुरस्कार - २०२६" हा पुरस्कार नुकताच सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.


गेली तीस-पस्तीस वर्षे आपल्या कलागुणांशी जोडलेले राजेश खर्डे वेसावकर अनेक शाळा अनेक कॉलेज आणि अनेक कंपन्यामध्ये नृत्य दिग्दर्शन करताहेत तसेच अभिनेता, गीतकार, दिग्दर्शक म्हणून बऱ्याच व्हिडिओमध्येही त्यांनी काम केलेलं आहे. त्यांचे वेसावची पारू,परंपरा वेसावकरांची, टिपा आर्केस्ट्रा, गंध मराठी मातीचा असे अनेक बॅनर रंगमंचावर लोक मनोरंजनास्तव कार्यरत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा त्यांच्या मिसेस ओबामा दोघं उभयता मुंबई दौऱ्यावर आले असताना, मी हाय कोळी या नृत्यावर डान्स करताना सर्वांनी त्यांना पाहिलं, त्यामागचं नृत्य कौशल्य म्हणजेच नृत्य दिग्दर्शन हे राजेश खर्डे यांनी केले होते.

कोळी नृत्य दिग्दर्शनामध्ये राजेश खर्डे यांचा अत्यंत जबरदस्त हातखंडा असल्याकारणाने दरवर्षी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्रीवर कार्यक्रमाची संधी त्यांना नेहमीच मिळते. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व अमृता फडवणीस यांचं एक रिव्हर गाणंही केलं होतं. या गाण्यांमध्ये परंपरा वेसावकरांची मधील संपूर्ण टीमसह चित्रीकरण वर्षा बंगल्यावर करण्यात आले होते. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानामध्ये आपल्या कलाकारांची टीमसह कोळी समाजाचे प्रसिद्ध कोळी नृत्य व दिग्दर्शनामध्ये खर्डे यांनी फार मोठा सहभाग नोंदवलेला आहे. त्यासोबतच महाराष्ट्र शासन,मत्स्य विभाग व इंडियन कोस्ट गार्ड यांचे दरवर्षीप्रमाणे कार्यक्रम ते स्वतः सलग करीत आहेत. गेली वीस वर्ष वर्सोवा सी फूड फेस्टिवल, सुरत फेस्टिवल, अहमदाबाद फेस्टिवल, जुहू फेस्टिवल, ट्रॉम्बे फेस्टिवल, उलवे नवी मुंबई फेस्टिवल,मध्ये सतत कार्यक्रम अशा अनेक फेस्टिवल मध्ये राजेश खर्डे हे अत्यंत कठोर मेहनत घेऊन आपल्या कलाकारांच्या टीमसह उत्तम व्यवस्थापन व नियोजनामुळे कार्यक्रम सादर करीत असतात. त्यांना यामुळेच फेस्टिवलचा बादशाह म्हणून त्यांची चाहत्यांमध्ये आता ओळख झालेली आहे.आज पर्यंत खर्डे यांना महाराष्ट्रातील अनेक संस्थांच्यावतीने असंख्य पुरस्कार मिळाले आहेत. इतकच नाही तर सन- २००८ मध्ये शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या दिग्दर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित जाणता राजा या महानाट्यामध्ये अंधेरी येथील छत्रपती शिवाजी महाराज संकुल मधील नऊ प्रयोगात, तीन तासांच्या कालावधीत त्यांनी एकाच वेळी 10 भूमिका ही साकारलेल्या होत्या. त्यापैकी त्यांची पाटलाची भूमिका ही लोकांच्या पसंतीस उतरली होती.

त्याबाबत बद्दल राजेश खर्डे यांना विचारले असता, त्यांनी असे म्हटले की, "यापूर्वी मला कोळी नटसम्राट, कोळी समाज रत्न, कोळी रत्नाकर, कोळी समाज भूषण असे पुरस्कार मिळाले आहेत. परंतु, मी छत्रपती शिवाजी महाराजांचा निस्सीम चाहता, भक्त असल्याने आजचा हा "शिवरत्न भूषण पुरस्कार-२०२६" हा पुरस्कार माझ्यासाठी सर्वात मोठा पुरस्कार आहे असं मी मानतो. त्यामुळे या पुरस्काराबद्दल मी शिवप्रेमी या संस्थेचे मनापासून आभार मानतो.

## महाराष्ट्र बोर्ड १२ वीचा निकाल कोणत्याही क्षणी!

**मुंबई (दै. संध्या)**




महाराष्ट्र बोर्डाच्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेला बसलेल्या १४ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी आहे. डिजीलॉकरच्या अधिकृत वेबसाईटवर "Class 12th Result 2026 Coming Soon" असा मेसेज दिसू लागला आहे, ज्याचा अर्थ असा की निकाल प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आहे. साधारणपणे निकाल जाहीर होण्यापूर्वी अशी अपडेट तांत्रिक पडताळणीसाठी दिली जाते. विविध सूत्रांनुसार, निकाल मे महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात जाहीर होण्याची दाट शक्यता आहे. काही रिपोर्ट्सनुसार १३ मे ते २५ मे दरम्यान निकाल लागू शकतो. बोर्डाचा निकाल साधारणपणे दुपारी १:०० वाजता ऑनलाईन उपलब्ध होतो. विद्यार्थ्यांनी आपला निकाल पाहण्यासाठी खालील दोन गोष्टी तयार ठेवाव्यात. हॉल तिकीटवर असलेला आपला बैठक क्रमांक, अर्जावर नोंदवलेले आईचे नाव. महाराष्ट्र बोर्ड एकाच वेळी विज्ञान, कला, वाणिज्य आणि व्यावसायिक शाखांचे निकाल जाहीर करणार आहे. मागील वर्षी विज्ञान शाखेचा निकाल सर्वाधिक ९७.३५% लागला होता. यावर्षीही निकालाचा टक्का वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## सिटी इंटरनॅशनल स्कूल अचानक बंद, फौजदारी व प्रशासकीय कारवाई करा

**मुंबई (दै. संध्या)**

ओशिवरा येथील नामांकित सिटी इंटरनॅशनल स्कूल प्रशासनाने शाळा अचानक बंद करण्याचा शाळा प्रशासनाने एकतर्फी निर्णय घेतल्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आल्याने, शाळा प्रशासनावर फौजदारी तसेच प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांनी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.


खासदार रविंद्र वायकर

ओशिवरा आणि गोरेगाव परिसरातील अनेक विद्यार्थी या शाळेत अनेक वर्षांपासून शिक्षण घेत आहेत. प्रवेशाच्या वेळी शाळा प्रशासनाने पालकांकडून ४०,००० रुपये 'देणगी' स्वरूपात स्वीकारले होते आणि इयत्ता १० वी पर्यंत विनाअडथळा शिक्षण देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आता शाळा प्रशासनाने अचानक शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थ्यांचे मानसिक आणि शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप पालकांकडून करण्यात येत आहे. शाळा सोडल्याचा दाखला देण्याऐवजी शाळा प्रशासन पालकांना ईमेलवर 'ट्रान्सफर सर्टिफिकेट' पाठवत आहे. शाळा बंद झाल्याची अधिकृत नोंद टाळण्यासाठी प्रशासन असे करत असल्याचा पालकांचा आरोप आहे. पालकांकडून घेतलेली मोठी रक्कम आणि फी यांबाबत शाळा प्रशासनाने कोणतीही स्पष्ट भूमिका घेतलेली नाही. शाळा अचानक बंद करण्याचा निर्णय शाळा प्रशासनाने घेतल्यामुळे आता या विद्यार्थ्यांना इतर शाळांमध्ये प्रवेश कसा मिळणार, असा प्रश्न पालकांसमोर उभा ठाकला आहे. या प्रश्नी पालकांनी खासदार रवींद्र वायकर यांची भेट घेतली होती. खासदार वायकर यांनी याची गंभीर दखल घेत शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना पत्र पाठवून

शाळा प्रशासनावर तातडीने फौजदारी आणि प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, पालकांकडून घेतलेली देणगीची रक्कम व्याजासह परत करण्यात यावी, 'शिक्षण हक्क कायद्या'नुसार बाधित विद्यार्थ्यांचे तातडीने शैक्षणिक पुनर्वसन करावे, विद्यार्थ्यांना रीतसर 'शाळा सोडल्याचा दाखला' मिळवून द्यावा.

शाळेच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ दिले जाणार नाही. सरकारने या प्रकरणात हस्तक्षेप करून पालकांना आणि विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा." अशी मागणी केली आहे.

# उरणमधील शकुंतला भारत गॅस एजन्सीवर कारवाई

**उरण (दै. संध्या)**




> उरण तालुक्यातील २० हजार धारकांना घरगुती गॅस सिलेंडरचे वितरण हे शकुंतला भारत गॅस एजन्सी करत आहे.परंतु सदर एजन्सी विरोधात अनेक तक्रारी प्राप्त होत असल्याने सदर शकुंतला भारत गॅस एजन्सी विरोधात कारवाई करण्यात आली आहे.
>
> **- डॉ उध्दव कदम तहसीलदार उरण**

> शकुंतला भारत गॅस एजन्सी ही उरण तालुक्यातील धारकांना घरगुती सिलिंडर गँस सिलेंडर चे वितरण वेळेत करत नाही तसेच सिलिंडर मध्ये हेराफेरी करत आहेत.त्यामुळे शकुंतला भारत गॅस एजन्सी वर कारवाई करण्यात यावी अशी आमची मागणी आहे.
>
> **- शिवाजी ठाकूर उपाध्यक्ष आर पी आय उरण तालुका**

गॅस धारकांशी अरेरावी करणे,बेकायदा गॅस सिलिंडर विकणे अशा अनेक प्रकारच्या तक्रारी वाढत असल्याने शकुंतला भारत गॅस या एजन्सीवर तालुका प्रशासनाने कारवाई केली आहे. एजन्सीला तत्काळ पुरवठा बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, वितरणाचा परवाना देखील रद्द करण्यात येणार असल्याची माहिती तालुका पुरवठा अधिकारी गजानन देशमुख यांनी दिली. एकंदरीत तालुक्यातील ही पहिलीच कारवाई ठरली आहे.

शकुंतला भारत गॅस या एजन्सीकडे भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडमार्फत व्यावसायिक एलपीजी सिलिंडर विक्रीचा अधिकृत परवाना आहे. मात्र सिलिंडर वितरण करताना राज्य सरकारने ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमाचे पालन न करता गॅस धारकांशी अरेरावी करणे, अनधिकृत व नोंदणी नसलेल्या व्यक्तींना सिलिंडर वाटप कारणे उरण पूर्व विभागात मोठीजुई कळंबुसरे कोप्रोली खोपटे परिसरात वेळेवर वाटप न करणे .अशा अनेक तक्रारी उरण तहसील कार्यालयाकडे प्राप्त होत असत, या प्रकारामुळे नागरिकांमध्ये एलपीजी पुरवठ्याबाबत गैरसमज निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन उरणचे तहसीलदार डॉ उध्दव कदम यांनी तत्काळ कारवाईचे निर्देश दिले. या आदेशांची तातडीने तालुका पुरवठा अधिकारी गजानन देशमुख यांनी अंमलबजावणी करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करण्याच्या साठी प्रयत्न असून भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांनाही सदरची माहिती देऊन पनवेल येथील वांरगे बंधू यांच्या पनवेल गॅस सर्व्हिसला उरण तालुक्यात घरगुती गॅस सिलेंडर चे वितरण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## CM फडणवीसांनी सुनावले; म्हणाले, “श्याम मानव कोण?”

**मुंबई (दै. संध्या)**

बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी नागपूर येथे येऊन छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्या संदर्भात केलेल्या विधानावरून वाद निर्माण झाला आहे. विरोधक, इतिहासकार धीरेंद्र शास्त्री यांनी केलेल्या विधानावरून टीका करत आहेत. अशातच माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांची भेट घेतली आहे. या भेटीमुळे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्याबाबत सुरू असलेल्या वादात नव्याने भर पडल्याचे सांगितले जात आहे. भूषण गवई आणि धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या भेटीवरून श्याम मानव यांनी केलेल्या विधानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरपूस शब्दांत समाचार घेतला आहे. सरन्यायाधीशासारखे सर्वोच्च पद भूषवूनही भूषण गवई हे धीरेंद्र शास्त्री यांच्यापुढे नतमस्तक होत असतील, तर आता त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारसा सांगू नये. भूषण गवई सांगतात की ते आंबेडकरी विचारांचे आहेत. पण जर ते धीरेंद्र शास्त्री यांच्या पाया पडून आशीर्वाद घेत असतील, तर त्यांनी आंबेडकरांचे नाव कधीही घेऊ नये. तो अधिकार त्यांनी गमावला आहे, अशी टीका श्याम मानव यांनी केली होती. पत्रकारांशी संवाद साधत असलेल्या मुख्यमंत्री फडणवीस यांना याबाबत प्रश्न विचारण्यात आला. भूषण गवईंनी आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊ नये, असं श्याम मानव म्हणाले होते, याबाबत मुख्यमंत्री फडणवीसांना प्रतिक्रिया विचारण्यात आली. यावर बोलताना, हे असे सांगणारे श्याम मानव कोण आहेत, त्यांना कोणी अधिकार दिला, ते आता सर्टिफिकेट वाटणार का, श्याम मानव अलीकडच्या काळात फक्त प्रसिद्धीसाठी बोलतात. त्यांना कुणी विचारत नाही. त्यांना प्रसिद्धी हवी आहे, म्हणून ते रोज अशी विधाने करतात, या शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुनावले.

## “छत्रपती शिवाजी महाराज कधी थकले नाहीत, झुकले नाहीत”

**मुंबई (दै. संध्या)**

छत्रपती शिवाजी महाराजांनी सत्ता सोडण्याचे ठरविले होते. छत्रपती शिवाजी महाराज युद्ध करून थकले व ते रामदास स्वामींकडे गेले. आता मला जास्त लढायचे नाही व हे मुकुट व सत्ता तुम्ही सांभाळा, असे ते त्यांना म्हणाले.



रामदास स्वामी त्यांना म्हणाले की, ठीक आहे. मात्र शिष्याचे कर्तव्य हे गुरुच्या आदेशांचे पालन करणे हे आहे. त्यामुळे आता माझी ही सत्ता तुम्ही सांभाळावी, असे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना म्हटले होते, असा दावा शास्त्री यांनी केला. यावरून राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, उद्धवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी यावर भाष्य केले आहे. पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि सरसंघचालक या दोन प्रमुख व्यक्ती आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे भान असायला हवे. त्यांच्या उपस्थितीत अशा बुवा-महाराजांना आणून इतिहासाची मोडतोड करण्याचे कारण काय? छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या ऊर्जेचा, उत्साहाचा आणि शौर्याचा अखंड प्रवाह आहेत. ते कधी थकले नाहीत आणि कधी झुकले नाहीत.

म्हणूनच आमचा महाराष्ट्र कधी थकत नाही आणि दिल्लीपुढे कधी झुकत नाही, असे संजय राऊत यांनी नमूद केले.

# विद्यार्थ्यांनी घेतले स्वसंरक्षणाचे मोफत धडे

**उरण (दै. संध्या)**



लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल कामोठे पनवेल व रायगड तायकवोंडो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जवळपास ४७० विद्यार्थ्यांना स्वरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य अविनाश कुळकर्णी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी शमिका कुळकर्णी, शुभांगी ठाकूर ,सुवर्णा मॅडम पल्लवी बुगाले व अक्षता चितळे प्राचार्य अविनाश कुळकर्णी सर आपल्या भाषणात म्हणाले की सुभाष पाटील हे आपल्या विद्यार्थिनींना मोफत प्रशिक्षण देतात त्यांचे खूप मोठे योगदान आहे आपल्या शाळेतील विद्यार्थिनींना तायक्वॉन्डो या खेळामध्ये राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवून दिलेली आहेत शाळेच्या विद्यार्थिनींना शारीरिक आणि मानसिक शक्तीला चालना देण्यासाठी तसेच कॉलेज आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याचा उद्देशाने त्यांना स्वयसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले शाळेत जाणाऱ्या विद्यार्थिनींची छेड काढण्याचे प्रकार घडतात अनेकदा त्यांच्यावर वाईट प्रसंग ही वाढतात अशी अनेक उदाहरणे सांगता येतील तेव्हा अशा प्रकारच्या घटनाही वारंवार घडतात महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात महिला सुरक्षित राहिल्या पाहिजेत विशेषतः शाळेत व कॉलेजच्या विद्यार्थिनींचे स्वयंरक्षणासाठी आत्मबल वाढले. पाहिजे त्याचबरोबर मुलींनी गुन्हेगारी विरोधात लढण्यासाठी सक्षम व्हावे या उद्देशाने लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल कामोठे अंतर्गत असे उपक्रम राबविण्यात येतात हे प्रशिक्षण आंतरराष्ट्रीय पंच सातवी डिग्री व मुख्य प्रशिक्षक सुभाष पाटील यांचे सहकारी अनिल म्हात्रे , जय पाटील, शीफा शेख, श्रेया लालु द्रुवल सालियान समर्थ बराटे आणि रियान शेख इत्यादींचे मार्गदर्शन लाभले विशेष म्हणजे या सेमिनार साठी महाविद्यालयच्या सर्व शिक्षिका उपस्थित होत्या आणि त्यांनी ही प्रशिक्षण घेतले असे सुभाष पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

